


# आता खरी गरज 'भारतीय मानसिकता'च बदलण्याची !!

डॉ. रघुनाथ माशेलकर

**दोन भारतीय एकत्र येतात तेव्हा सहकार्याने वागण्याऐवजी परस्परांना शह देण्यातच धन्यता मानतात. हे चित्र बदलायचे आणि एक भारताचे स्वप्न साकारायचे तर आपल्याला केवळ आपल्या बुद्धीला वेगळा आकार देऊन चालणार नाही तर संपूर्ण समाजाची एकंदर मानसिकताच बदलावी लागेल. सर्वांगीण प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या आर्थिक बळाची आपल्याकडे जरूर कमतरता आहे. परंतु त्या उणीवेवर आपण विधायक आशावादी मानसिकतेच्या आधारे निश्चितच मात करू शकतो...**

एकविसाव्या शतकाचे वर्णन अनेकजण 'ज्ञानाचे शतक' अशा शब्दात करतात. परंतु थोडा अधिक खोलात जाऊन विचार केला तर हे शतक (सेंन्चुरी ऑफ माईंड) आहे, असेच म्हणावे लागेल.

आज घडीस भारताची ५५ टक्के लोकसंख्या २५ वर्षांहून कमी वयोगटातील आहे. याचा सरळ अर्थ असा की या देशाचे भवितव्य आता अन्य कोणी नाही तर सुमारे ६० कोटी तरुणांची बुद्धीच ठरविणार आहे. घडविणार आहे. अर्थात भारतीयांच्या बुद्धीचा दर्जा व एकूण गुणवत्तेबद्दल कोणाच्याच मनात शंका नाही. 'आकड्यांच्या अर्थशास्त्रांचा पाया घालण्याचे श्रेय भारतीयांचे आहे. शून्याचा शोध त्यांनी लावला नसता तर हे नवे अर्थशास्त्र अस्तित्वातच आले नसते.

आपण सर्वांनी काही काळापूर्वी ऑलिम्पिक स्पर्धांचा नेत्रदीपक उद्घाटन सोहळा पाहिला. या स्पर्धांसाठी आपण नेहमीच मोठमोठी क्रीडा पथके पाठवितो, परंतु एखादे रौप्य व ब्रांझ पदक वगळता आपल्या हाती फारसे काही लागत नाही. एक काळ हॉकीचे सुवर्णपदक ही आपली मिरासदारी होती, परंतु ती केव्हाच संपुष्टात आलेली आहे, मात्र 'खेळाच्या ऑलिम्पिकमध्ये आपले फारसे चालत नसले तरी बुद्धीच्या ऑलिम्पिकमध्ये आपण नेहमीच आघाडीवर असतो हे विसरून चालणार नाही. सायन्स ऑलिम्पियाडमध्ये गेल्या वर्षी आपल्या एकोणीस युवकांनी भाग घेतला आणि त्यापैकी प्रत्येकजण पदक जिंकूनच मायदेशी परतला. भारतीय बुद्धीचे सामर्थ्य सिद्ध करण्यासाठी एवढे एक उदाहरणही पुरेसे आहे. आज आपण येथे 'रोपिंग यंग माईंडस् प्रोग्रॅम संबंधात विचार करीत आहोत. तो करतांना माईंड (बुद्धी) आणि माईंड सेट (मानसिकता) यातील मुलभूत फरक समजावून घेणे गरजेचे आहे. बुद्धी ही हुशारीचे प्रतिनिधीत्व करते आणि उत्तम निरीक्षण व विश्लेषण करविते परंतु अखेर आपला जीवनविषयक दृष्टीकोन निश्चित करते ती आपली मानसिकताच. आपल्याकडे बुद्धी व ही मानसिकता यांच्यात जबरदस्त संघर्ष सुरु आहे. एकीकडे ही मानसिकता आपल्याला एकविसाव्या शतकाकडे नेत आहे पण त्याचवेळी दुसरीकडे ती आपल्याला चौदाव्या-पंधराव्या शतकातही खेचत आहे.

सध्या प्रत्येकजण 'वैश्विक खेड्यांविषयी' बोलतो आणि काय अचाट कल्पना आहे असे म्हणून त्याचे कौतुकही करतो. परंतु ही कल्पना सर्वप्रथम मांडली कोणी ? 'वसुधैव कुटुंबकम्' ची ही कल्पना हा भारतीय मनाचा अविष्कार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांनी 'हे विश्वचि माझे घर' असे म्हटले खरे, पण आज आपण मंडळी नेमका काय विचार करीत आहोत ? आम्हा सर्वांचे एक कुटुंब आहे, असे आपण नेहमी म्हणतो. परंतु दोन जपानी नागरिक एकत्र येतात, तेव्हा काय घडते हे तुम्हाला माहित आहे ? एक जपानी नागरिक दुसऱ्याला भेटतो तेव्हा एक अधिक एक बरोबर दोन असे नाही तर एकावर एक अकरा असे काही तरी घडते. पण दोन भारतीय एकत्र येतात तेव्हा मात्र आपल्या विशिष्ट मानसिकतेमुळे ते एकमेकांना शह देतात आणि एकसंघ निर्माण करू शकत नाहीत. त्यामुळे हे चित्र बदलायचे तर केवळ बुद्धीला वेगळा आकार देऊन भागणार नाही तर संपूर्ण भारतीय मानसिकतेसच वेगळा आकार द्यावा लागेल. आपल्याकडे किती हुशार, बुद्धीमान



*ही मुलेच उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे.*



*'ग्लोबल व्हिलेज' या संकल्पनेमुळे बॅटरी व सौरशक्तीवर चालणाऱ्या अशा गाड्या आता हळूहळू सर्वत्रच दिसू लागतील.*

व विश्लेषक माणसे आहेत याचा विचार करणे पुरेसे नाही तर विधायक व द्रष्ट्या विचारांची माणसे अधिकाधिक संख्येने कशी तयार होतील याचा विचारही झाला पाहिजे. तो झाला तरच आपण एकविसाव्या शतकातील भारताची रचना करू शकू.

आपण आपल्या गुरूंना वंदन करताना 'गुरूः ब्रह्मा गुरूः विष्णु' असे म्हणतो. याचा अर्थ आपण शिक्षकांकडे 'देव' म्हणून पाहातो. माझे शाळेतील गुरू प्रिन्सिपॉल भावे यांच्या संबंधातील एक छोटी गोष्ट मी २००० साली झालेल्या 'सायन्स काँग्रेस'मध्ये सांगितली होती. तत्कालिन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी त्या समारंभाचे अध्यक्ष होते. समारंभ आटोपल्यावर भोजनासाठी आम्ही एकत्र जमलो तेव्हा 'असे महान शिक्षक सध्या का दिसत नाहीत?' असा प्रश्न कोणीतरी विचारला, त्यावर अटलजी म्हणाले की, 'माशेलकरजी, आपको पता है ऐसा क्यो नही होता ? इसका कारण यही है, की समाज मे आज उनको प्रतिष्ठा नही है ।' आजच्या समाजात भाव्यांसारखे शिक्षक निपजत नाहीत. कारण समाज त्यांचा आदरच राखत नाही. आपण भले 'गुरूः साक्षात परब्रह्म' असे म्हणत असलो तरी प्रत्यक्ष व्यवहारात मात्र शिक्षकांना अजिबात किंमत देत नाही ही वस्तुस्थिती आहे आणि या विसंगतीचे मूळ आपल्या विशिष्ट मानसिकतेत दडलेले आहे. भारतीय बुद्धी आणि भारतीय मानसिकतेतील हे द्वंद्व संपविणे हेच आपल्यापुढील सर्वात मोठे आव्हान आहे.

माझ्या वैयक्तिक जीवनावर अनेक मोठ्या लोकांचा प्रभाव आहे. त्यांनी मला जे अनेक धडे दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. तुमच्यापैकीही काहींना अशी मोठी माणसे भेटली असतील, ज्यांनी तुम्हाला नवे काही करण्याची प्रेरणा व स्फूर्ती दिली असेल. माझी सर्वात मोठी गुरू आहे ती माझी आई ! माझा जन्म अतिशय गरीब कुटुंबात झाला आणि वयाच्या सहाव्या वर्षीच मला पितृछत्र गमवावे लागले. त्यावेळी दोन वेळच्या पोटभर जेवणासही आम्ही महाग होतो. बारा वर्षांचा होईतो मी रस्त्यावरच्या दिव्याखाली बसून अभ्यास केला आणि अक्षरशः अनवाणी फिरलो. पुढे सातवी पास झाल्यावर आठवीत जायचे तर माध्यमिक शाळा प्रवेशासाठी फक्त २१ रुपयांची गरज होती, पण माझ्या आईजवळ तर तेवढेही पैसे नव्हते. अखेर एका मोलकरणीने उसने पैसे देऊन आमची नड भागविली. अकरावीच्या परीक्षेत मी १ लाख ३५ हजार विद्यार्थ्यांत अकरावा आलो खरा पण पुढील शिक्षणासाठी पैसे नसल्याने मला नोकरीच शोधणे भाग होते. सुदैवाने सर दोराब टाटा ट्रस्टची मासिक साठ रुपयांची शिष्यवृत्ती मला




*सायन्स ऑलिम्पियाडमध्ये दैदीप्यमान यश प्राप्त केलेले भारतीय विद्यार्थी*

मिळाली. आणि त्या शिष्यवृत्तीच्या बळावरच मी आज तुमच्यापुढे उभा आहे. आज मी टाटा ग्रुपच्या संचालक मंडळावर आहे आणि पूर्वी जेथे मी शिष्यवृत्तीचे साठ रुपये घ्यायला जात असे तेथेच मी आता टाटा मोटर्सचा संचालक म्हणून बसत असतो. गेल्या चार दशकांच्या काळात माझ्या जीवनात हे जे आमुलाग्र परिवर्तन झाले त्यास मुख्यतः माझी आईच जबाबदार आहे. तिच्या हट्टामुळेच मी उच्च शिक्षण घेतले आणि तिनेच माझ्यावर अनेक उत्तम संस्कारही केले.



माझे दुसरे मोठे गुरू आहेत ते प्रि. भावे. त्यांनी मला पदार्थ विज्ञान शिकविले. एका शुक्रवारी दुपारच्या वेळी ते आम्हा विद्यार्थ्यांना अंतर्गोल-बहिर्गोल भिंगांची रचना समजावून देण्यासाठी बाहेर उन्हात घेऊन गेले. एका हातात कागद आणि दुसऱ्या हातात विशिष्ट अंतरावर एक भिंग घेऊन त्यांनी तो कागद पेटवून दाखविला आणि मग ते माझ्याकडे वळून म्हणाले की, माशेलकर, तू तुझ्या सर्व शक्ती याप्रकारे केंद्रीत केल्या तर जगातील कोणतीही गोष्ट साध्य करू शकशील !

हा प्रयोग तुम्हाला काही एक नवा धडा देतो. सूर्याचे समांतर किरण अंतर्गोल भिंगाच्या सहाय्याने एकवटले तर कागद जाळू शकतो. समाजाचे नेतृत्व या भिंगासारखे असते. ते विविध आचारविचारांच्या माणसांना एकत्र आणते आणि त्या एकजुटीच्या बळावरच मोठमोठी कामे तडीस नेते. दुदैवाने सध्या तरी आपल्याकडे अशा नेत्यांची वानवा आहे. सध्याचे नेते विविध समाजघटकांमध्ये एकजुट निर्माण करण्याऐवजी त्यांच्यात जात-धर्म वा अशाच काही गोष्टींच्या आधारे फुट पाडण्यातच आनंद मानत आहेत. आमच्या निवडणुकांना आता अनेक ठिकाणी जातीधिष्ठीत मतदानाचे स्वरुप प्राप्त झाले आहे. ते बदलण्यासाठी आपण अंतर्गोलिय नेतृत्वाचीच पाठराखण केली पाहिजे. ज्यायोगे आपण एक समाज-एक भारत बनू शकू.

प्रा. एम. एम. मिश्रा यांचाही माझ्या जीवनावर फार मोठा प्रभाव आहे. वयाच्या २८ व्या वर्षी केमिकल इंजिनिअर होऊन ते केंब्रिजहून परतले आणि विद्यापीठात प्रोफेसर बनले. त्यांचे सारे संशोधन 'कल्पनाधिष्ठित' होते आणि त्यासाठी त्यांना प्रतिवर्षी दहा हजार रुपयांचे अनुदान मिळे. ते त्यांच्या संशोधन कार्यात मग्न होते तेव्हा माझ्याकडे अमेरिका व कॅनडातील अनेक संस्थांकडून शिष्यवृत्त्यांचे प्रस्ताव आले होते, परंतु मिश्रांसारखा असाधारण गुरु अन्य कोठेही भेटणार नाही. हे



लक्षात आल्यानंतर मी ते सर्व प्रस्ताव नाकारले आणि त्यांच्या संशोधनात सहभागी झालो. माझी ओळख करुन देतांना आज 'रॉयल सोसायटीची फेलोशिप मिळालेले विसाव्या शतकातील तिसरे इंजिनिअर'' असा उल्लेख केला गेला. आमचे प्रा. मिश्रा हे ती फेलोशिप मिळविलेले पहिले इंजिनियर होते, हे मी येथे मुद्दाम नमूद करू इच्छितो. 'रॉयल सोसायटीची फेलोशिप प्राप्त झालेली गुरु-शिष्यांची आगळी जोडी असेच आमचे वर्णन करावे लागेल.

आपल्या देशातील फार मोठे शास्त्रज्ञ प्रा. सीएनआर राव हे माझे चौथे गुरू होत. ते माझ्या आयुष्यात तसे बरेच उशीरा आले. आज वयाच्या ७५ व्या वर्षीही ते दिवसाचे सर्व २५ तास ... २४ नव्हे आपल्या विविध कामात व्यग्र असतात. 'नोबेल' वगळता अन्य सर्व प्रमुख पुरस्कार मिळविलेला हा शास्त्रज्ञ माझा 'आदर्श' आहे. मला कोणताही मोठा पुरस्कार वा सन्मान मिळाला की मी त्यांच्याकडे जातो आणि ते 'नॉट बॅड' एवढ्या एकाच शब्दाने माझी बोळवण करतात. विशेष म्हणजे 'फॉरेन ॲसोसिएट ऑफ यु.एस.नॅशनल ॲकॅडमी ऑफ सायन्स' या दुर्मिळ सन्मानासाठी माझी निवड झाली तेव्हाही राव सरांची प्रतिक्रिया 'नॉट बॅड' अशीच राहिली आणि त्यामुळे मात्र मी खरोखरच निराश झालो. पण मग त्यांनी मला 'लिमिटलेस लॅडर ऑफ एक्सलन्स'ची व्याख्या समजावून सांगितले आणि 'तुझा सर्वोच्च व सर्वोत्तम सन्मान तर अजून व्हायचायं असे बोलून दाखविले.

राव सरांनी दिलेला हा 'लिमिटलेस एक्सलन्स'चा धडा सर्वांनीच लक्षात घेण्यासारखा आहे. आपल्या क्षमतांचा केवळ पूर्ण उपयोग करून घेणे नव्हे तर त्यापेक्षाही अधिक काही मिळविणे हेच आपले ध्येय असले पाहिजे. अर्थात ते साध्य करायचे तर आपल्याला आपली मानसिकताच बदलावी लागेल. ही मानसिकता केवळ वैयक्तिक नाही तर संख्यात्मकही असते. आयआयटीची मानसिकता, एनसीएलची मानसिकता आणि मॅनेजमेंट असोसिएशनची मानसिकता वेगवेगळी असते पण त्या प्रत्येकाचे प्रतिबिंब भारतीय मानसिकतेत आढळते हे लक्षात घेतले पाहिजे.



*प्रा. सी.एन.आर. राव आणि डॉ. रघुनाथ माशेलकर*

१९८९ ते ९५ या काळात मी एनसीएलचा संचालक होतो. रसायनशास्त्राच्या या सर्वोत्तम लॅबोरेटरीत आम्ही नवे तंत्रज्ञान शोधणे आणि ते उद्योगक्षेत्राकडे हस्तांतरीत करून व्यापारी उत्पादनास हातभार लावणे अपेक्षित असते. या लॅबोरेटरीच्या नावावर अशी अनेक मोठमोठी कामे जमा आहेत. मी तेथे संचालक म्हणून रुजु झाल्यानंतर जेव्हा जेव्हा काही वेगळे संशोधन होई तेव्हा तेव्हा उद्योग क्षेत्रातील धुरीणांच्या भेटीस जात असे. परंतु विशेष म्हणजे त्यांना मी नव्या संशोधनाची माहिती दिली की त्यांच्याकडून 'काय हे इथे झाले', असा प्रश्न हमखास विचारला जाई. हा प्रश्न विचारतांना त्यांच्या मनात असे काम जपान-अमेरिका वा युरोपातच होऊ शकते. आपल्याला ते जमणेच शक्य नाही.' असा विचार असे, मी 'भारतीय मानसिकता' म्हणतो ती हीच. ती बदलण्याचे आव्हान स्विकारून मी

*राष्ट्रीय रासायनिक प्रयोगशाळा, पुणे*



१९८९ मध्ये नॅशनल केमिकल लॅबोरेटरी ही लौकरच 'इंटरनॅशनल केमिकल लॅबोरेटरी' होईल अशी घोषणा केली, ती करण्यामागे माझा उद्देश यापुढे आमची बाजारपेठ केवळ भारतापुरती मर्यादित राहाणार नाही,' हेच स्पष्ट करण्याचा होता परंतु मी ही घोषणा केली तेव्हा अनेकांनी एनसीएलकडेच नव्हे तर एकूण भारतीय संशोधन व क्षेत्राकडेच पैशाची मोठी कमतरता आहे, असा मुद्दा मांडला आणि पैशाअभावी कोणतेच काम होणे शक्य नाही, असा निर्वाळा दिला. या छिद्रान्वेषी टीकाकारांना माझे उत्तर एकच होते, ते म्हणजे 'आमच्याकडे पैशाची कमतरता असली तरी कल्पनाशक्तीची नाही, आणि तेच सर्वाधिक महत्त्वाचे आहे. अखेर 'थिंकींग बीग इज व्हाट मॅटरर्स'



रतन टाटा आपल्या नॅन्यो गाडीसमवेत

एनसीएलची स्थापना १९५० मध्ये झाली, पण पहिली ३९ वर्षे म्हणजे १९८९ पर्यंत तिच्या नावावर एकही अमेरिकी पेटंट नव्हते. माझ्या कारकिर्दीत हे चित्र पूर्णपणे बदलले आणि अमेरिकेतील जनरल इलेक्ट्रिक कंपनी' आमची ज्ञान भागीदार झाल्यानंतर अल्पावधीत तीनशेहून अधिक बड्या बहुराष्ट्रीय कंपन्याही भारतात दाखल झाल्या आणि आज आपल्या देशास चक्क जागतिक ज्ञानोत्पादन केंद्राचे स्थान प्राप्त झाले आहे. या साऱ्या परिवर्तनाची सुरुवात एनसीएलमध्ये झाली आणि भारतीय युवक केवळ रिव्हर्स इंजिनिअरिंग मध्ये नाही तर 'फॉरवर्ड इंजिनिअरिंग' मध्येही अव्वल कामगिरी बजावू शकतात, हे साऱ्या जगाच्या लक्षात आले. ही कमाल 'आय कॅन डू इट', आय विल डू इट' या मंत्राची होती, त्याने भारतीयांच्या मानसिकतेला एक वेगळेच विधायक सकारात्मक परिमाण प्राप्त करून दिले आहे.

१९४७ मध्ये आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र झालो. मी त्याला भारताचे पहिले स्वातंत्र्य म्हणतो. त्यानंतर दुसऱ्या स्वातंत्र्याची - आर्थिक स्वातंत्र्याची - पहाट उगविली ती थेट १९९१ मध्ये. तेव्हा डॉ. मनमोहनसिंग यांनी भारतीय अर्थव्यवस्थेची दारे सर्वांसाठी खुली करून आर्थिक उदारीकरणाचे वारे देशात खेळवायला सुरुवात केली. आज जीवनाच्या विविध क्षेत्रात आपण जे स्वास्थ्य व समृद्धी अनुभवत आहोत, ती सारी या आर्थिक स्वातंत्र्याची फळे आहेत आणि त्यांचा लाभ आपल्याला मानसिकता बदलल्यामुळेच मिळत आहे. १९९१ पूर्वीच्या


ग्लोबल व्हिलेज या संकल्पनेची दृश्य चित्रे आता दुबईतही पाहायला मिळत आहेत.



कालबाह्य मानसिकतेस आपण कवटाळून बसलो असतो तर आज आपल्या रस्त्यांवर टाटांची 'नॅनो मोटार' फिरतांनाच दिसली नसती. अवघ्या एक लाख रुपयांत सर्व सुखसोयी व युरोच्या पर्यावरण निकषांनी युक्त अशी 'नॅनो' रतन टाटा बनवू शकले आहेत ते त्यांना जागतिक स्पर्धेत उतरण्याची परवानगी व प्रोत्साहन मिळाल्यामुळेच. १९९१ पूर्वी आपल्याकडे या स्पर्धेलाच स्थान नव्हते आणि आपल्या सर्वच कल्पक उद्योजकांचे हात नाना प्रकारच्या सरकारी नियंत्रण-निर्बधांनी बांधले गेलेले होते. १९९१ मध्ये हे अनावश्यक नियम-निर्बंध हटविले गेले आणि मग उत्तम पण स्वस्त मोटार बनविण्याचे जे स्वप्न जेआरडी टाटा १९७८ मध्ये पाहात होते ते रतन टाटांनी पूर्ण केले.

जीवनाकडे आशावादी दृष्टीकोनातून पाहाणे, हीच आजच्या काळाची खरी गरज आहे, असा दृष्टीकोनच आपल्याला उन्नत आणि प्रगत बनवू शकतो. आधी म्हटल्याप्रमाणे मी अनेक जणांकडून अनेक गोष्टी शिकलो आहे. काही काळापूर्वी मला सुनील गावसकर व नंदू नाटेकर या दोन महान खेळाडूंबरोबर काही वेळ घालविण्याची संधी मिळाली. सुनीलने क्रिकेटचे तर नाटेकरांनी बॅडमिंटनचे विश्व गाजविले आहे आणि मी स्वतः विज्ञानाच्या क्षेत्रात काही कामगिरी करून दाखविली आहे. साहजिकच आमच्या चर्चेत एकमेकांच्या अनुभवांची देवाण-घेवाण झाली. ती करतांना मी सुनीलला म्हटले की सलामीवीर म्हणून तू फलंदाजीस उतरतो तेव्हा खेळपट्टी वा प्रतिपक्षाच्या गोलंदाजीतील वैविध्य याची तुला फारशी कल्पना नसते, परंतु तरीही तुझ्या हातून दरवेळी उत्तम खेळ कसा काय होतो ? माझ्या या प्रश्नास सुनीलने जे उत्तर दिले ते खूप काही सांगून जाणारे आहे. तो म्हणाला, ''खरे तर डावाच्या सुरुवातीला मी अनेक चेंडूंवर चकत असतो. चुकलेला प्रत्येक चेंडू म्हणजे एकाअर्थी माझा पराभव असतो. परंतु पुढच्या चेंडूला सामोरे जातांना मी त्याचा विचार अजिबात करीत नाही. आपल्याला पडणारा प्रत्येक नवा चेंडू हा डावाचा पहिलाच चेंडू आहे असे मी मानतो आणि त्यामुळे निराशा ही कधी माझ्या मनाला शिवूच शकत नाही.''

"I only think of the future, because that is where I am going to spend my life." असे कोणीतरी म्हटलंय आणि ते अगदी योग्य आहे. माणसाचे आयुष्य म्हणजे यशापयशाचा लपंडाव आहे. तो खेळतांना यशस्वी झालात तर गर्वाने फुलू नका. जो काही अनुभव वाट्याला येईल त्यापासून काही तरी चांगले शिकतच आपण जीवनाची वाटचाल केली पाहिजे. तशी ती करणे जमायचं तर आपली मानसिकता सदैव विधायक व सकारात्मक ठेवणे हाच एकमेव उपाय आहे.

■■■







# वाढत्या महागाई विरोधात केंद्र व राज्यांनी संयुक्त लढा देणे गरजेचे

## - शरद पवार

**जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतवाढी संबंधात विचार करण्यासाठी ६ फेब्रु. २०१० रोजी नवी दिल्लीतील 'विज्ञान भवनात' राज्यांच्या मुख्यमंत्र्यांची खास परिषद झाली. तेथे केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी केलेले भाषण :**

जीवनावश्यक वस्तुंची वाढती महागाई रोखायची तर एकूण कृषीउत्पादन व उत्पादकता वाढविण्यास पर्याय नाही. त्यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी संयुक्तपणे व एकदिलाने प्रयत्न करणे हीच आजच्या काळाची खरी गरज आहे.

आदरणीय पंतप्रधान, अर्थमंत्री, सर्व मुख्यमंत्री आणि अन्य सन्मान्य प्रतिष्ठित, जीवनावश्यक वस्तुंच्या महागाईवर विचार करण्यासाठी आयोजित केलेल्या या परिषदेस आपण सर्वजण आपला अमूल्य वेळ खर्चून आला आहात, मी आपल्याला धन्यवाद देतो आणि आपले मनःपूर्वक स्वागत करतो.

काही जीवनावश्यक वस्तुंचे भाव भडकल्यामुळे ही परिषद होत असली तरी आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, वस्तुंच्या किंमती वाजवी पातळीवर राखण्यासाठी आपण कृषी उत्पादन आणि उत्पादकतेशी संबंधित सर्व मुद्द्यांचा विचार करणेही गरजेचे आहे.

२००४-०५ ते २००८-०९ या काळात मोसमी पावसाची मिळालेली सुरेख साथ आणि आपल्या शेतकऱ्यांची मेहनत यामुळे आपल्या कृषीउत्पादनात लक्षणीय वाढ झाली. २००८-०९ साली आपण विक्रमी ५९ दशलक्ष टन धान्याचे उत्पादन केले. त्यात गव्हाचा वाटा ३३ दशलक्ष टनांचा तर तांदुळाचा वाटा २६ दशलक्ष टनांचा राहिला. या वाढत्या उत्पादनामुळे आपल्या 'बफर स्टॉक' ची स्थिती सुधारली आणि मग साहजिकच एकूण किंमतपातळी स्थिर राहाण्यात त्याचा मोठा हातभार लागला, जीवनावश्यक वस्तुंच्या सध्याच्या वाढत्या महागाईबद्दल बोलतांना या मुद्द्याचा मी नंतर तपशीलाने उहापोह करीन.

नैऋत्य मोसमी पावसाने यंदा आपल्याला दगा दिला असून, सरासरीपेक्षा २३ टक्के पाऊस कमी झाल्यामुळे अनेक राज्यातील कृषीउत्पादन घटले आहे. सध्या देशातील १४ राज्यांमध्ये (३३४ जिल्हे) दुष्काळ जाहीर झाला आहे, परंतु परिस्थिती बिकट असतांनाही पंजाब व हरियानासारख्या काही राज्यांनी मात्र आपापली उत्पादन पातळी टिकवून धरली आहे. बिहारसारख्या राज्याने डिझेल सबसिडी योजना राबवून दुष्काळाची तीव्रता कमी करण्याचे प्रयत्न केले आहेत तर जलसंधारण क्षेत्रात उत्तम काम करून गुजरातने आपल्या शेतकऱ्यांना भरघोस काम मिळवून दिले आहे. अन्य राज्यांनीही अशाच प्रकारचे उपाय योजले असून, त्यांच्या व केंद्र सरकारच्या अथक प्रयत्नांमुळेच आपण सध्याच्या आव्हानांचा समर्थपणे मुकाबला करू शकत आहोत. खरीपाच्या पिकांचे कमीतकमी नुकसान व्हावे आणि रब्बी हंगामात जास्तीत जास्त उत्पादन व्हावे यासाठी केंद्र व राज्य सरकारांनी शेतकऱ्यांना अनेक सवलती व अनुदाने उपलब्ध करून दिली असून, आता रब्बीचा हंगाम चांगला जाईल व खरीप हंगामात झालेले नुकसान काही प्रमाणात तरी भरून निघेल अशी चिन्हे दिसत आहेत.

अर्थात आपल्या कृषीउत्पन्नात क्षमतेचा पुरेपुर वापर करून घेण्यात आपण अजूनही कमी पडत असून, माझ्या दृष्टीने तीच चिंतेची बाब आहे. राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान, राष्ट्रीय बागायत अभियान आणि तेलबिया, डाळी, पाम व मका आदि पिकांसाठी एकात्मिक योजना आखल्या गेल्यानंतरही आपण अद्याप आपली कृषीउत्पादन यंत्रणा पुरेशी कार्यक्षम बनवू शकलेलो नाही.



**जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता वाढावी आणि देशातील दुर्बल समाजघटकांना अनुदानित दरात अन्नधान्य उपलब्ध व्हावे, म्हणून आवश्यक ती पावले टाकत असतांना आपल्याला साठेबाजी व काळाबाजार करणाऱ्यांना चापही लावावा लागणार आहे. त्यासाठी राज्य सरकारांच्या हाती जीवनावश्यक वस्तु कायदा व काळाबाजार प्रतिबंध कायदा यासारखी शस्त्रे आहेत. त्यांचा वापर बहुतेक सर्व राज्य सरकारे करीत आहेतच, परंतु त्यांनी अधिक सजग राहावे, असे माझे त्यांना आवाहन राहील. अर्थात जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदींचा उपयोग कोणाला अकारण त्रास देण्यासाठी मात्र होऊ नये. कायद्याच्या अंमलात आमचे तुम्हांला संपूर्ण सहकार्य राहील.**




*जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतीबाबत नवी दिल्लीत झालेल्या सर्व राज्यांच्या मुख्यमंत्र्यांच्या परिषदेत केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार बोलत असून व्यापीठावर प्रो. के. व्ही. थॉमस, डॉ. मनमोहनसिंग, प्रणव मुखर्जी आणि मॉन्टेकसिंग अहलुवालिया*

हवामान बदलाचा कृषी क्षेत्रावर होणारा परिणाम नाकारता येण्याजोगा नाही. दुष्काळ व महापुरांमुळे धान्योत्पादनावर होणाऱ्या विपरीत परिणामांना सामोरे जाण्यास आपण सदैव सज्ज राहिले पाहिजे आणि आपल्या नागरिकांच्या विशेषतः गोरगरीबांच्या - अन्न सुरक्षेची तजवीज केली पाहिजे. हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नेमके काय करावे यासंबंधीच्या माझ्या काही सूचना मी येथे आपल्यासमोर मांडत आहे.

सर्वात महत्त्वाचे म्हणजे, येत्या काही वर्षांत कृषी क्षेत्रास पाणीटंचाईचा मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. त्याची तीव्रता कमी करण्यासाठी आपण मोठ्या पाटबंधारे योजनांचा पाठपुरावा हिरीरीने करूच, परंतु जलसंधारणाच्या छोट्या-छोट्या प्रारुपांची अंमलबजावणी उत्तमप्रकारे करून काही राज्यांनी आपापली उत्पादनक्षमता वाढविण्यात जे यश मिळविले आहे त्यापासून इतर सर्व राज्यांनीही योग्य तो धडा घेतला पाहिजे, त्यासाठी एनआरईजीएसचा वापर प्रभावीपणे करून घेता येईल, त्याबाबतची मार्गदर्शक तत्त्वे कृषी मंत्रालयाने यापूर्वीच प्रसूत केली आहेत.

दुसरी गोष्ट म्हणजे, उत्पादकतेत आवश्यक तेवढी वाढ होत नसलेल्या राज्यांनी आता संशोधन आणि सुधारित कृषी तंत्राच्या मदतीने आपापली उत्पादकता कमी वेळात वाढविण्यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. कडधान्ये व डाळींप्रमाणे पशुधन व मच्छीमार क्षेत्रांतील उत्पादकता वाढविणेही गरजेचे आहे, हे मी येथे मुद्दाम नमुद करू इच्छितो.

राष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय अन्नसुरक्षा अभियान व राष्ट्रीय बागायत अभियान यासारख्या काही मुख्य उपक्रमांच्या माध्यमातून केंद्र सरकार कृषी क्षेत्रासाठी अधिक निधींची तरतुद करीत आहे, परंतु या निधीचा वापर राज्यांकडून योग्य प्रकारे होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. तो होण्यासाठी उत्तम नियोजन करावे आणि कृषीउत्पादन व उत्पादकता वाढवावी, असे माझे सर्व राज्यांना आवाहन राहील.

लागवडक्षेत्र व एकूण उत्पादन यासंबंधात राज्य सरकारांकडून जी काही माहिती मिळते त्यावर आम्ही अवलंबून असतो, ही माहिती वेळेवर आणि उत्तम आकडेवारीसह उपलब्ध झाली तर नव्या योजनांची आखणी आम्ही अधिक चांगल्या प्रकारे करू शकू.

या वर्षी घाऊक व किरकोळ किंमतींतील तफावत वाढली आहे. ती कमी होण्यासाठी प्रभावी उपाययोजना केली पाहिजे.

माझ्या या सर्व सूचनांची अंमलबजावणी झाली तर अन्नधान्याची उपलब्धता व किंमती या प्रश्नाची उकल आपण

चांगल्या प्रकारे करू शकू, असा मला विश्वास वाटतो. यासंदर्भात आपणा सर्वांचे विचार ऐकण्यास मी उत्सुक आहे.

वाढती महागाई हा सध्या आपल्या चिंतेचा सर्वात मोठा विषय आहे. वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी अन्न धान्याचा पुरवठा वाढविणे हा सरळ मार्ग आहे. परंतु तो निवडायचा तर आयातीशिवाय पर्याय नाही. आयात अन्नाधान्याच्या किंमती अर्थातच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील धान्य उपलब्धता व दर यावर अवलंबून असतात. आज आपल्याला गरज असलेल्या अनेक वस्तूंच्या आंतरारष्ट्रीय किंमती देशांतर्गत किंमतींपेक्षा चढ्या आहेत. त्याची कारणे जाणून घेऊन जीवनावश्यक वस्तुंची महागाई रोखण्यासाठी आपण काही नवे मार्ग शोधले पाहिजेत. या भाषणात मी मुख्यतः गहू-तांदुळ-डाळी-खाद्यतेले व साखर या वस्तुंशी संबंधित मुद्द्यांचा उहापोह करू इच्छितो.

तांदुळ आणि गहू - गेल्या काही वर्षात सरकारी पातळीवर झालेल्या विक्रमी खरेदीमुळे सध्या आपल्याकडे गहू व तांदुळाचा पुरेसा साठा आहे. या दोन्हींच्या किमान हमी किंमतींत आमच्या सरकारने मोठी वाढ केली आहे, हे आपण जाणताच. १९९९-२००० मध्ये गव्हाची किमान हमी किंमत ५५० रू. प्रतिक्विंटल एवढी होती. आता ती अकराशे रुपयांवर गेली आहे. तांदुळाच्या किमान हमी किंमती ४९० रूपये प्रतिक्विंटलवरून एक हजार रुपये प्रतिक्विंटल झाल्या आहेत. शेतकऱ्यांना त्यांच्या श्रमाचा चांगला मोबदला देण्यास आम्ही वचनबद्ध असून, किमान हमी किंमतीतील भरघोस वाढ हे त्याचेच द्योतक आहे. या किंमती आणखी वाढवाव्यात, अशी मागणी आपल्यापैकी अनेकांकडून केली जात आहे, परंतु तसे केले तर किरकोळ बाजारपेठेत गहू-तांदुळाच्या किंमती अधिकच वाढतील, हे लक्षात घेतले पाहिजे. या संदर्भात जो काही निर्णय घ्यायचा तो उत्पादक आणि ग्राहक या दोन्ही घटकांचे कल्याण-साधणाराच असला पाहिजे.

राज्यांच्या स्थानिक करांमुळे धान्य खरेदीचा खर्च वाढत चालला आहे आणि पर्यायाने अन्नधान्य अनुदानाच्या रकमेतही वाढ करणे सरकारला भाग पडत आहे. सन २०००-२००१ मध्ये ही रक्कम बारा हजार कोटी रुपये होती, आता ती



६५ हजार कोटी रुपये झाली आहे. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वाटप होणाऱ्या धान्याचे दर सर्वांना परवडतील असे राखण्यावर आमचा कटाक्ष आहे. त्यामुळे २००२ सालापासून तेथे अंत्योदय लाभधारकांना २ रु. प्रतिकिलो दराने गहू व३ रु. प्रतिकिलो दराने तांदुळ पुरविला जात आहे. दारिद्रय रेषेखालील नागरिकांसाठी हेच दर अनुक्रमे ४.१५ रु. प्रतिकिलो व ५.६५ रु. प्रतिकिलो असे आहेत. ही दरपातळी स्थिर राखण्यासाठी भारत सरकारला प्रतिकिलो गहू व तांदुळामागे ९ ते १६ रुपये अनुदान द्यावे लागते.

याखेरीज महागाईस आळा घालण्यासाठी व खुल्या बाजारातील विक्री योजनेसाठी राज्यांना वीस लाख टन गहू व दहा लाख टन तांदुळ उपलब्ध करून देण्यात आला आहे. परंतु अनेक कारणांमुळे त्याचा पुरेपुर लाभ उठविणे राज्यांना शक्य होत नाही, असे दिसते. मोठ्या पीठ गिरण्यांसाठी आम्ही १५ लाख टन गहू लिलावाद्वारे विकण्याची व्यवस्था केली आहे आणि रेशनकार्ड धारकांना जादा दहा किलो धान्य देण्याचा निर्णयही नुकताच घेतला आहे. हे जादा धान्य किमान हमी किंमतीच्या दराने विकले जाईल. दरम्यान, नाफेड व एनसीसीएफमार्फत अनुदानित दराने धान्य व डाळी विकण्यासही परवानगी दिली गेली आहे.

या सर्व उपयायोजनांमुळे भाववाढीस आळा बसेल असा मला विश्वास आहे. केंद्राच्या सर्व योजनांचा संपूर्ण लाभ घ्या आणि आपापल्या वाट्याचा धान्यकोटा पूर्णपणे उचला, असे माझे सर्व राज्य सरकारांना आवाहन राहील. अन्नधान्यावर लादलेल्या करांचाही त्यांनी फेरविचार करावा, अशी माझी विनंती आहे. पंजाब व हरियानासारख्या राज्यांत व्हॅट व अन्य स्थानिक करांचे प्रमाण १० टक्क्यांहून अधिक आहे तर उत्तर प्रदेश, राजस्थान, बिहार व गुजरातमध्ये ते ३ ते ८ टक्के एवढे आहे. हे कर रद्द केले जाणे सध्याच्या कठीण परिस्थितीत गरजेचे आहे.



## साखरेचा कोटा यापुढे साप्ताहिक तत्त्वावर विकणे बंधनकारक



फेब्रुवारी २०१० साठी केंद्र सरकारने १७.९१ लाख टन साखर (१५.९७ लाख टन बिगर लेव्ही + १.९४ लाख टन लेव्ही) उपलब्ध करून दिली आहे. त्यापैकी बिगर लेव्ही साखरेची विक्री पाक्षित तत्त्वावर दोन समान हप्त्यात करण्याचे आदेश साखर कारखान्यांना देण्यात आले होते व विक्री न झालेली साखर लेव्ही कोट्यात जमा केली जाणार होती.

आता या व्यवस्थेत काही बदल करण्यात आले असून फेब्रु. २०१० साठी खुला करण्यात आलेला बिगर लेव्ही साखरेचा कोटा साप्ताहिक तत्त्वावर चार हप्त्यात विकण्याचे आदेश साखर कारखान्यांना देण्यात आले आहेत. त्याचे कोष्टक पुढीलप्रमाणे राहील.

| आठवडा | तारीख | विक्री व वितरणाचे प्रमाण |
|---|---|---|
| १ ला आठवडा | १ ते ७ फेब्रु. २०१० | मासिक कोट्याचा २० टक्के भाग |
| २ रा आठवडा | ८ ते १४ फेब्रु. २०१० | मासिक कोट्याचा ३० टक्के बाग |
| ३ रा आठवडा | १५ ते २१ फेब्रु. २०१० | मासिक कोट्याचा २५ टक्के भाग |
| ४ था आठवडा | २२ ते २८ फेब्रु. २०१० | मासिक कोट्याचा २५ टक्के बाग |

दर आठवड्यास कारखान्याबाहेर पाठविल्या गेलेल्या व प्रत्यक्ष विक्री झालेल्या साखरेसंबंधीचा अहवाल प्रत्येक आठवड्याच्या अखेरीस (म्हणजे १४, २१ व २८ फेब्रुवारी आणि ७ मार्चला) साखर संचालनालयाकडे पाठविण्याच्या सूचनाही साखर कारखान्यांना देण्यात आल्या आहेत. दर आठवड्यास विक्री न झालेली साखर लेव्हीच्या कोट्यात जमा केली जाईल. बिगर लेव्ही साखरेच्या विक्रीचा साप्ताहिक अहवाल ज्या कारखान्यांकडून वेळेत पाठविला जाणार नाही, त्यांनी त्या साखरेची ठरल्याप्रमाणे विक्री केली नाही असे मानले जाईल

खाद्यतेलाच्या बाबतीत स्वयंपूर्ण नसल्यामुळे जागतिक किंमत स्थितीचा परिणाम आपल्यावर होणे अटळ आहे. परंतु सरकारने वेळीच योग्य ती धोरणे राबविल्यामुळे जागतिक किंमतवाढीच्या धक्क्यांची तीव्रता बरीच कमी झाली आहे. गेल्या सहा महिन्यांत सोयाबीन तेल, मोहरीचे तेल, शेंगदाणा तेल व पामोलिनच्या देशांतर्गत किंमती ४ ते ११ टक्क्यांनी वाढल्या, पण याच काळात त्यांच्या जागतिक किंमतीत मात्र तब्बल २३ टक्के वाढ झाली हे लक्षात घेतले पाहिजे.

खाद्यतेले वाजवी दरात उपलब्ध व्हावीत. यासाठी सरकारने अनेक उपाय योजले आहेत. क्रुड व रिफाइन्ड खाद्य तेलांवरील आयातशुल्क एप्रिल २००८ पासून पूर्णपणे माफ करण्यात आले असून, सर्व प्रमुख खाद्यतेलांच्या निर्यातीवर बंदी घालण्यात आली आहे. खाद्यतेले व तेलबियांच्या साठ्यावर योग्य ते निर्बंध घालण्याचे अधिकार राज्य सरकारांना दिले गेले असून संबंधित आदेशाची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. आवश्यकता भासली तर ही मुदत आणखीही वाढविली जाईल.

रेशनकार्ड धारकांना प्रतिकिलो १५ रू. अनुदानित दरांत आयात खाद्यतेलाची विक्री करण्याची योजना यंदा ३१ ऑक्टोबरपर्यंत चालू राहाणार आहे. अर्थात अद्यापपावेतो तरी त्याचा लाभ फक्त आंध्र प्रदेश, तमिळनाडू, महाराष्ट्र व हिमाचल प्रदेश या चार राज्यांकडूनच घेतला जात आहे. आता अन्य राज्य सरकारांनाही तो घ्यावा आणि आयात खाद्यतेलाचे वितरण अनुदानित दरात करून ग्राहकांना दिलासा द्यावा.

साखरेची किंमतवाढ हा आपल्या सर्वांच्याच दृष्टीने चिंतेचा विषय आहे. २००७-०८ साली आपल्याकडे २६३ लाख टन साखरेचे उत्पादन झाले पण २००८-०९ मध्ये हा आकडा १४७ लाख टनांवर आला होता. आता २००९-१० साली २४९.४८ लाख टन साखर उत्पादित होईल असा प्राथमिक अंदाज आहे. गरजेपेक्षा कमी साखर उत्पादन होत असल्याने साखरेच्या किंमतीत लक्षणीय वाढ झाली आहे. दुदैवाने, ब्राझीलमधील गळित हंगामास अतिवृष्टीचा तडाखा बसल्यामुळे सध्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतही साखरेचे दर तेजीत आहेत. अर्थात एकूण परिस्थिती कठीण असली तरी देशात साखरेचा पुरवठा सुरळितपणे होत राहावा, यासाठी सरकारने अनेक पावले उचलली आहेत. कच्च्या व रिफाइन्ड साखरेच्या आयातीवरील शुल्क पूर्णपणे माफ करण्यात आले असून, गतवर्षी २३ लाख टन कच्ची तर२.२५ लाख टन पांढरी साखर आयात करण्यात आली. नव्या वर्षात आत्तापर्यंत १९ लाख टन कच्ची साखर आयात झाली असून, आणखी चार लाख टन लवकरच दाखल होईल. याखेरीज, १०.७५ लाख पांढरी साखर आयात केली जाणार असून, त्यापैकी ३.९ लाख टन साखर आपल्या हाती पडलेली आहे.

साखरेच्या किंमतवाढीचा विचार करतांना शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या ऊसाच्या किंमती २५०० रू. प्रतिटनावर गेल्या आहेत, हे ही लक्षात घेतले पाहिजे.

साखरेचा पुरवठा सुरळितपणे होण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलत असतांना सरकारने घाऊक विक्रेते व बड्या ग्राहकांकडील साखर साठ्यांवर निर्बंधही लादले आहेत. या साठ्यांची मर्यादा निश्चित करण्याचे राज्य सरकारांना देण्यात आले असून त्यांच्याकडून संबंधित निर्बंधांची कसून अंमलबजावणी होईल, अशी अपेक्षा आहे. साखरेवर लादलेल्या अनेक करांचाही त्यांनी फेरविचार करणे जरुरीचे आहे. दिल्ली-गुजरात-कर्नाटक, पं. बंगाल व बिहारसारख्या काही मोजक्या राज्यांनी आयात साखरेवरील 'व्हॅट' यापूर्वीच रद्द केला आहे. आता अन्य राज्यांनीही त्यांचे अनुकरण करावे. पंजाब व मध्य प्रदेशसारख्या राज्यांमध्ये साखरेवर 'एंट्री टॅक्स' लावला जातो, त्याचा त्यांनी फेरविचार केला पाहिजे. हा 'एंट्री टॅक्स' छत्तीसगढमध्ये नुकताच रद्द झाला आहे.

साखर कारखान्यांनी आयात केलेल्या साखरेवरील प्रक्रियेवरून उ. प्रदेशात काही पेच निर्माण झाला आहे. स्थानिक ऊसाचे गाळप झाल्यानंतरच आयात साखरेवरील प्रक्रियेस परवानगी देण्याचा निर्णय तेथील सरकारने घेतला असून, त्यामुळे प्रक्रियाखर्च मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. ते संकट टाळण्यासाठी आम्ही आयात साखरेवरील प्रक्रिया





## तांदुळ खरेदी २० दशलक्ष टनांवर

**सरकारतर्फे होणाऱ्या तांदुळ खरेदीने या हंगामात २० दशलक्ष टनांचा टप्पा पार केला आहे. देशभरातील खरेदी यंत्रणांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आत्तापर्यंत एकूण २०.१४ दशलक्ष टन तांदुळाची खरेदी झाली आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हा आकडा फक्त तीन टक्क्यांनी कमी असून, देशाच्या अनेक भागांना अवर्षणाचा फटका बसला असतांनाही हंगामातील तांदुळ खरेदीवर त्याचा फारसा परिणाम झालेला नाही, हेच त्यावरून स्पष्ट होते. तांदुळ खरेदीत पंजाब आघाडीवर असून (९.२७ दशलक्ष टन) त्यापाठोपाठ छत्तीसगढ (२.५१ द.ल. टन), आंध्रप्रदेश (२.१२ द.ल. टन), उत्तर प्रदेश (२.११ द.ल. टन), हरियाना (१.८१ द.ल. टन) व ओरिसा (१.०५ द. ल. टन) या राज्यांचा नंबर लागतो.**

अन्य राज्यांत करण्याची परवानगी सर्व संबंधित कारखान्यांना दिली आहे. पण निदान आता तरी उ. प्रदेश सरकारने आपल्या निर्णयाचा फेरविचार करावा आणि बाजारपेठेत साखरेची कृत्रिम टंचाई निर्माण होणार नाही, याची काळजी घ्यावी.

गोड साखरेच्या महागाईची कडू गोळी गिळणे साऱ्या देशासाठीच फार त्रासाचे आहे. ही महागाई रोखण्यासाठी केंद्र सरकार शक्य ते सर्व प्रयत्न करीत आहे, पण साखरेच्या किंमती स्थिर राखण्यासाठी आणखी काय करता येईल, हे तुमच्याकडून जाणून घेण्यासही मी उत्सुक आहे.

डाळींची भाववाढ ही आपल्या चिंतेचा आणखी एक विषय आहे. सध्या डाळींचे देशांतर्गत उत्पादन १४ ते १५ दशलक्ष टन एवढे असले तरी एकूण मागणीच्या तुलनेत ते कमी असल्याने डाळींची आयात करणे भाग पडते. ही आयात आपण उपलब्धतेनुसार वेगवेगळ्या देशांतून करतो. त्यामुळे डाळींच्या किंमती सतत बदलत्या राहातात. या परिस्थितीवर मात करायची तर लागवड क्षेत्र व उत्पादकता वाढवून डाळींचे उत्पादन वाढविणे, हाच पर्याय आहे. अर्थात हे उत्पादन पूर्णपणे पावसावर अवलंबून असल्याने त्यात चढ-उतार होत राहणे अटळ आहे. त्यास पायबंद घालण्यासाठी पाटबंधारे क्षेत्राचा विकास झाला पाहिजे. दरम्यान, आपले शास्त्रज्ञ व संशोधक कमी अवधीत अधिक पीक देणाऱ्या डाळींच्या विविध नव्या जाती शोधण्याच्या प्रयत्नात असून, त्यांनी तयार केलेल्या काही नव्या जातींचे बियाणे शेतकऱ्यांपर्यंत यापूर्वीच पोहचले आहे. या रब्बी हंगामात गेल्या वर्षीपेक्षा साडे सात लाख हेक्टर जादा क्षेत्रात डाळींची लागवड झाली असून, त्यामुळे उत्पादनात लक्षणीय वाढ होईल, अशी अपेक्षा आहे.

अर्थात, धान्योत्पादन वाढीसाठी सुरू असलेल्या या प्रयत्नांची फळे मिळण्यास काही वर्षे जावी लागतील आणि आपल्याला चिंता आहे ती सध्याची महागाई रोखण्याची. गेल्या पंधरवड्यात या महागाईची तीव्रता काही अंशी कमी झाली असली तरी एकूण किंमतपातळी तशी चढीच आहे. ती उतरून ग्राहकांना स्वस्त दरात धान्य उपलब्ध होईल याची काळजी आता आपणच घ्यायची आहे, डाळींची देशांतर्गत उपलब्धता वाढविण्यासाठी सहकारी संस्था तसेच सार्वजनिक क्षेत्रास डाळी आयात करण्याची परवानगी देण्यात आली आहे. या आयात व्यवहारात त्यांचे नुकसान झाले तर त्याची भरपाई काही प्रमाणात सरकार करणार आहे. याखेरीज, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विक्री होणाऱ्या आयात डाळीवर प्रतिकिलो दहा रुपये सबसिडी दिली जात आहे. या योजनेअंतर्गत आत्तापर्यंत १.४० लाख टन डाळीची देशातील नऊ राज्यांत विक्री झाली आहे. लाभार्थी राज्यांत प. बंगाल, तामिळनाडू, केरळ, आंध्र प्रदेश, महाराष्ट्र, उ. प्रदेश, हरियाना, राजस्थान व हिमाचल प्रदेशचा समावेश आहे. 'नाफेड' व 'एनसीसीएफ'लाही त्यांच्या यंत्रणांमार्फत अनुदानित आयात डाळींची विक्री करण्यास परवानगी दिली आहे. आमचे हे सारे प्रयत्न यशस्वी होतील आणि डाळींच्या वाढत्या महागाईस आळा बसेल, अशी मला खात्री आहे.

जीवनावश्यक वस्तुंची उपलब्धता वाढावी आणि देशातील दुर्बल समाजघटकांना अनुदानित दरात अन्नधान्य उपलब्ध व्हावे, म्हणून आवश्यक ती पावले टाकत असतांना

# गव्हाच्या पेरणी क्षेत्रात यंदा वाढ

देशभरातील सर्व राज्यांकडून केंद्राकडे पाठविण्यात आलेल्या माहितीनुसार, यंदा एकूण २७७.५८ लाख हेक्टर क्षेत्रात गव्हाची पेरणी झाली आहे. गेल्या वर्षी २७५.८७ लाख हेक्टर क्षेत्रात ही पेरणी झाली होती. गव्हाचे पेरणी क्षेत्र वाढविण्यात मध्य प्रदेश, बिहार, उत्तराखंड व हिमाचल प्रदेश या राज्यांनी पुढाकार घेतला असून, गुजरात, राजस्थान, उत्तर प्रदेश व जम्मु-काश्मिर मधील पेरणी क्षेत्र मात्र काही प्रमाणात घटले आहे.

गव्हाप्रमाणे तांदुळाच्या पेरणी क्षेत्रातही वाढ अपेक्षित होती. परंतु यंदा २२.६१ लाख हेक्टर क्षेत्रातच तांदुळाची लागवड झाली असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत हे क्षेत्र १.१४ लाख हेक्टरने घटले आहे. त्याचा वापर डाळींच्या पिकासाठी करून घेतला जात असला (मुख्यतः आंध्र प्रदेशात) तरी डाळींच्या लागवडीखालील एकूण क्षेत्र गतवर्षाइतकेच राहाण्याची शक्यता आहे. या सर्व पिकांची वाढ जोमदार पद्धतीने होत असून, एकूण स्थिती समाधानकारक आहे. तेलबियांचे पेरणीक्षेत्र यंदा सहा लाख हेक्टरने घटले आहे.

मुख्य रब्बी पिकांच्या लागवडीखाली गेल्या वर्षी व यंदा असलेले पेरणी क्षेत्र :

| | स्थिती २०१० | स्थिती २००९ |
|---|---|---|
| १) गहु | २७७.५८ लाख हेक्टर | २७५.८७ लाख हेक्टर |
| २) तांदुळ | २२.६१ | २३.७५ |
| ३) ज्वारी | ४४.९९ | ४९.१५ |
| ४) बार्ली | ७.५३ | ७.१८ |
| ५) मका | १०.१७ | १०.३५ |
| एकूण तृणधान्ये | ६२.९९ | ६७.०१ |
| ६) मोहरी + जवस | ६४.३८ | ६६.५१ |
| ७) सूर्यफुल ८.०६ | १०.९४ | |
| ८) भुईमूग | ७.७७ | ७.४२ |
| एकूण तेलबिया | ८८.९२ | ९४.५९ |
| ९) हरभरा | ८७.५६ | ८२.९८ |
| १०) मसूर | १५.२१ | १४.६६ |
| ११) उडीद | ६.९७ | ५.४३ |
| १२) मुग | ४.७५ | ३.८६ |
| एकूण डाळी | १३७.३५ | १२९.५५ |







आपल्याला साठेबाजी व काळाबाजार करण्याऱ्यांना चापही लावावा लागणार आहे. त्यासाठी राज्य सरकारांच्या हाती जीवनावश्यक वस्तु कायदा व काळाबाजार प्रतिबंध कायदा यासारखी शस्त्रे आहेत. त्यांचा वापर बहुतेक सर्व राज्य सरकारे करीत आहेतच, परंतु त्यांनी अधिक सजग राहावे, असे माझे त्यांना आवाहन राहील. अर्थात जीवनावश्यक वस्तु कायद्यातील तरतुदींचा उपयोग कोणाला अकारण त्रास देण्यासाठी मात्र होऊ नये. कायद्यांच्या अंमलात आमचे तुम्हांला संपूर्ण सहकार्य राहील. जीवनावश्यक वस्तुंच्या भाववाढीविरोधातील हा लढा केंद्र व राज्य सरकारांनी संयुक्तरीत्या व एकजुटीने दिला पाहिजे. या भाषणात मी ज्या विविध बाबींचा उहापोह केला आहे त्यावर आपण अल्पकालीन व दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजना परस्पर सहमतीने आखणे गरजेचे आहे. आता यासंबंधातील तुमची मते आणि सूचना ऐकण्यास मी उत्सुक आहे. धन्यवाद !

■■■




# मुख्यमंत्री परिषदेत झालेल्या कामकाजाचा आढावा

**जी**वनावश्यक वस्तुंच्या वाढत्या किंमतींशी संलग्न मुद्द्यांवर चर्चा करण्यासाठी ६ फेब्रुवारी २०१० रोजी राजधानी दिल्लीत एक खास मुख्यमंत्री परिषद झाली. ग्राहक व्यवहार व नागरी पुरवठा मंत्रालयातर्फे आयोजित या परिषदेस पंतप्रधान डॉ. मनमोहनसिंग, सर्व राज्यांचे मुख्यमंत्री, कृषी, अन्न व नागरी पुरवठा खात्यांचे मंत्री, कॅबिनेटच्या किंमतसंबंधी समितीचे सदस्य व वरिष्ठ सरकारी अधिकारी उपस्थित होते.

वाढत्या महागाईपासून गरीब व दुर्बल नागरिकांचे रक्षण करणे, ही केंद्र व राज्य सरकारांची प्रमुख जबाबदारी असून, त्यांनी परस्पर सहकार्याने ती पार पाडली पाहिजे, हे तत्त्व या परिषदेत मान्य करण्यात आले. तेथे झालेल्या चर्चा व विचारविनिमयाचा भर अन्नधान्याचे उत्पादन वाढवून देशाची अन्नसुरक्षा साधण्यासाठी तातडीच्या व दीर्घकालीन अशा दोन्ही प्रकारच्या उपाययोजनांवर राहिला. लोकसंख्यावाढीबरोबरच नागरिकांच्या उत्पन्नवाढीचाही सध्याच्या माहागाईस मोठा हातभार लागलेला आहे. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी सारख्या योजनांमुळे ग्रामीण भागातील नागरिकांच्या उत्पन्नातही लक्षणीय वाढ झाली आहे. याखेरीज अन्नधान्याच्या किमान हमी किंमतीत झालेली वाढ, काही वस्तुंची टंचाई, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील तेजी, क्रयशक्ती, वाढल्यामुळे एकूणच मागणीत झालेली वाढ, कृषीउत्पनांच्या विक्री व्यवस्थेतील त्रुटी आणि भरमसाठ दलाली अशा अनेक गोष्टी महागाईस जबाबदार आहेत.

अर्थात, जीवनावश्यक वस्तुंच्या किंमतवाढीस किमान हमी किंमतीतील वाढही जबाबदार असली तरी त्यामुळेच गहू व तांदुळाचे अधिक उत्पादन होण्यास व त्यांची विक्रमी खरेदी होण्यास चांगला हातभार लागला आहे, हे या परिषदेत मान्य करण्यात आले. स्वातंत्र्योत्तर काळात प्रथमच अन्नधान्याच्या किमान हमी किंमतीत सरकारने मोठी वाढ केली असून त्यामुळे धान्याच्या राखीव साठ्यात लक्षणीय भर पडली आहे. परिणामी सध्या महागाई असली तरी देशात कोठेही अन्नधान्याची टंचाई नाही. सरकारी धान्य खरेदी मोहीम यशस्वी होण्यात सर्व राज्य

सरकारांनी आत्तापर्यंत महत्त्वाची भूमिका बजावली असली तरी यापुढील काळातही आपल्या यंत्रणा कार्यक्षम ठेवून धान्य खरेदी वेळेत होईल, याची खबरदारीही त्यांना घ्यावी लागणार आहे. सध्याच्या महागाईस पायबंद बसावा म्हणून गहू व तांदूळाचा जो जादा साठा सध्या उपलब्ध आहे तो खुल्या बाजारातील विक्रीसाठी तसेच सार्वजनिक धान्य वितरण व्यवस्थेसाठी केंद्रातर्फे उपलब्ध करून दिला जाईल.

अन्नधान्याच्या किंमती जागतिक पातळीवर वाढल्या आहेत. त्यामुळे त्यापासून भारत अलिप्त राहू शकत नाही. परंतु एकंदर महागाई रोखण्यासाठी केंद्राप्रमाणे राज्य सरकारांच्या पातळीवरही काही प्रयत्न होणे गरजेचे आहे. त्याचा एक भाग म्हणून चलनवाढीस पायबंद घालण्यासाठी केंद्र सरकारने काही आर्थिक व प्रशासनिक उपाय योजले आहेत तसेच रिझर्व्ह बँकेकडूनही पतपुरवठा धोरणांत आवश्यक ते बदल केले जात आहेत. अर्थात सध्याचा आर्थिक प्रगतीचा वेग कमी होणार नाही याची दक्षता घेऊनच ही सर्व पावले टाकली जात आहेत. परंतु या तातडीच्या व अल्पकालीन उपाययोजनांप्रमाणे अन्नधान्य उत्पादन व उत्पादन क्षमतेत - मुख्यतः खाद्यतेले व डाळींच्या - वाढ होण्यासाठी काही दीर्घकालीन उपायही योजावे लागणार आहेत.



कृषी प्रगतीचे उद्दिष्ट गाठण्यासाठी सध्या केंद्र व राज्य सरकारांतर्फे कृषी व संलग्न क्षेत्रविकासाच्या ज्या विविध योजना राबविल्या जात आहेत त्यांत समन्वय साधण्याचा, २००९-१० च्या रब्बी-उन्हाळी हंगामात बियाणे उत्पादन कार्यक्रम राबविण्याचा, राष्ट्रीय कृषी विकास योजना अधिक मजबूत करण्याचा आणि लहरी पर्जन्यमान लक्षात घेऊन पर्यायी पीक योजना राबविण्याचा निर्णयही या परिषदेत घेण्यात आला.

आयात केलेले अन्नधान्य, सार्वजनिक वितरण व्यवस्थेद्वारा गरजू लाभधारकांपर्यंत पोचविण्यात राज्य सरकारांनी पुढाकार घ्यावा, असे यावेळी ठरविण्यात आले. राष्ट्रीय स्तरावर योग्य ती धोरणे आखली जाण्यासाठी राज्यांनी आवश्यक ती सर्व माहिती वेळेवर व अचूक पुरविणे गरजेचे आहे, या मुद्द्यावर परिषदेत एकमत झाले.

दलाल व मध्यस्थांवर होणारा खर्च कमीतकमी व्हावा यासाठी सहकारी व अन्य संस्थांची मदत घेण्यात यावी आणि घाऊक व किरकोळ दरातील तफावत घटून किंमती स्थिराव्यात यासाठी कृषीउत्पन्न बाजारपेठांचे कामकाज सुधारणे गरजेचे आहे. आता आगामी काळात त्यास सर्वोच्च प्राधान्य देण्याची तयारी राज्य सरकारांनी दर्शविली आहे. त्यासाठी केंद्र सरकारकडून त्यांना सर्वतोपरी सहाय्य व सहकार्य दिले जाईल.

देशाच्या विकासकार्यक्रमात कृषी क्षेत्रास सर्वाधिक महत्त्वाचे स्थान मिळावे, असे आवाहन या परिषदेत करण्यात आले. सुधारित तंत्रज्ञानाचा अंगिकार करून आणि केंद्र सरकारच्या कृषी विकास योजनांशी योग्य तो ताळमेळ राखून कृषी उत्पादकता वाढविण्यात राज्य सरकारांनी महत्त्वाची भूमिका बजावावी, असेही यावेळी ठरविण्यात आले.

राज्यांचे मुख्यमंत्री व संबंधित केंद्रीय मंत्र्यांचा एक अभ्यासगट स्थापण्यात यावा आणि या गटाने पुढील विषयांचा उहापोह करुन योग्य त्या शिफारशी कराव्यात, अशी सूचना परिषदेने केली आहे.

१) कृषि उत्पादन व उत्पादकता वाढविणे.
(स्थायी कृषी प्रगतीसाठी दीर्घकालीन धोरणे आखणे)
२) कृषी उत्पादन किंमत व किरकोळ किंमत यातील तफावत कमी करणे.
३) जीवनावश्यक वस्तू कायद्याची अधिक चांगल्या प्रकारे अंमलबजावणी व त्यातील दुरुस्त्या.
४) समाजातील दुर्बल घटकांपर्यंत सर्व जीवनावश्यक वस्तु अधिक चांगल्या प्रकारे व कार्यक्षमतेने पोचविणे.
५) सरकारी गोदामांची संख्या व साठवणक्षमता वाढविणे. (शीतगृहांसह)
६) बियाणे, खते आदींशी संबंधित मुद्दे.

हा अभ्यास गट स्थापण्यास भारत सरकारने मान्यता दिली आहे.

■■■

# समस्यांच्या भोवऱ्यात मनमोहन सरकार

- विजय नाईक, नवी दिल्ली



संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर डॉ मनमोहन सिंग यांचे सरकार अनेक जटील समस्यांच्या भोवऱ्यात अडकल्याने त्यांची दाट छाया अधिवेशनावर पडली. सरकारला ३१५ सदस्यांचा पाठिंबा असल्याने स्थैर्याला धक्का नाही. परंतु समस्यांबाबत सरकार गाफील राहिल्याने जीवनावश्यक वस्तूंच्या भाववाढीने गरीब होरपळून निघत आहे. तेलंगणाबाबत 'थंडा करके खावो' या केंद्राच्या नेहमीच्या धोरणामुळे आंध्रप्रदेशमध्ये भडका उडालाय. नक्षलवादी माओवाद्यांनी पश्चिम बंगालमध्ये पश्चिम मिदनापूर जिल्ह्यातील सिल्दा येथील छावणीवर हल्ला करून निमसुरक्षादलाच्या २५ गाफिल जवानांना यमसदनी पाठविल्याने राज्यसरकारची सुरक्षा यंत्रणा किती तकलादू आहे, हे सिद्ध झाले. गृहमंत्री पी. चिदंबरम यांनी नक्षलवाद्यांना दिलेल्या धमक्यांना व आवाहनांना अद्याप कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. उलट त्यांच्या हिंसक कारवाया वाढत आहेत. त्यात आदिवासी भरडला जातोय. दुसरीकडे, ''पाकिस्तानबरोबर बोलणी सुरू करणार,'' असे जाहीर करताच पुण्यातील जर्मन बेकरीवर झालेला दहशतवाद्यांचा हल्ला व त्यात १४ निरपराध लोकांचे गेलेले बळी, यामुळे चर्चेतून काय निष्पन्न होणार, हे उभे राहिलेले प्रश्नचिन्ह, याकडे पाहाता, ''तुम्ही दहशतवाद चालू ठेवा, आम्ही बोलणी चालू ठेवू '' हीच नव्या धोरणाची नांदी आहे काय, असाही प्रश्न उभा राहातो.

त्या समस्यात भर पडली आहे, ती युरियाच्या किरकोळ किमती १० टक्क्याने वाढविण्याच्या व अन्य खतांच्या किमती नियंत्रण मुक्त करण्याच्या केंद्राने घेतलेल्या निर्णयाची. निर्णय रास्त असला, तरी वर्षानुवर्षे अनुदानाची सवय लावल्याने शेतकरी पुन्हा रस्त्यावर येणार हे निश्चित. संसदेत शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींची जोरदार लॉबी आहे. त्यामुळे यावरून संसदेत रणकंदन होणार. त्याचबरोबर, शाहरूख खान याच्या वक्तव्यावरून शिवसेनेने मुंबईत केलेला राडा, व त्यामुळे 'मराठी माणूस हा अत्यंत संकुचित वृत्ती व असहनशील आहे,' ही निर्माण झालेली प्रतिमा, आदी घटनांनी संयुक्त पुरोगामी सरकार पुढे राजकीय आव्हानांनी रांग लावली आहे.

## दहशतवाद व भारत-पाक चर्चा

पी. चिदंबरम यांनी गृहमंत्रालयाची सुत्रे हाती घेतल्यापासून १३ फेब्रुवारी २०१० रोजी पुण्यात झालेल्या हल्ल्याने त्यांची चिंता वाढलीय, तसेच पुढे आणखी काय वाढून ठेवले आहे, याबाबत सरकार अंधारातच आहे. कोणताही हल्ला झाला, की ''ते गुप्तचर यंत्रणांचे अपयश नाही,'' हे पालुपद लावण्याची सरकारला आता सवय झाली आहे. सारांश, गुप्तचर यंत्रणातील कुणालाही त्याबाबत जबाबदार धरले जात नाही, त्यांचे काही उत्तरदायित्व अथवा जबाबदारी नाही, असा याचा अर्थ आहे काय? गेल्या अनेक वर्षात आयबी (इंटेलिजन्स ब्युरो), रॉ (रिसर्च अँड ॲनॅलिसिस विंग) आदी संस्थातील उच्चाधिकाऱ्यांवर कारवाई केल्याचे एकही

**२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ''पाकिस्तानने काही प्रमाणात 'सकारात्मक' कारवाई केली,'' असा दावा सरकारतर्फे करण्यात आला. तथापि, त्यावर कुणाचाही विश्वास बसलेला नाही. पाकिस्तानने सकारात्मक असे नेमके काय केले, याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण परराष्ट्र मंत्रालयाने दिलेले नाही. पाकिस्तानने पुढाकार घेऊन कारवाईबाबत पारदर्शक दाखविलेली नाही. उलट पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधून दहशतवादी संघटनांचे म्होरके रोज भारताविरूद्ध डरकाळ्या फोडत आहेत. ''हे 'नॉन स्टेट ॲक्टर्स' आमच्या आवाक्याबाहेर आहेत,'' असा कांगावा पाकिस्तानचे नेते सातत्याने करीत असतात. या परिस्थितीला कोणतेही परिणामकारक उत्तर सरकारकडे नाही, असेच सातत्याने दिसून येते.**

उदाहरण नाही. सरकारी खात्यांतील कारभाराची छाननी संसदीय समित्यांतर्फे होते, तशी छाननी गुप्तचर विभाग अथवा संस्थांची करावी, ही मागणी कोणत्याही सरकारने स्वीकारलेली नाही. त्यामुळे संस्थांच्या कपाटातील सांगाडे बाहेर येत नाही. कारगिलमधील तोलोलिंगवर पाकिस्तानने छुपा हल्ला चढविल्याची खबरही राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार असताना वाजपेयी सरकारला लागली नव्हती, त्यावेळीही ''गुप्तचर संस्थांचे हे अपयश नाही,'' असेच निवेदन सरकारने केले होते.




'इंडिया टुडे'ने प्रसिद्ध केलेल्या आकडेवारीनुसार, लष्कर-ए-तैय्यबाला हाताशी धरून पाकिस्तानी आयएसआयने २००५ मध्ये सुरू केलेल्या 'कराची प्रॉजेक्ट' च्या योजनेनुसार, भारतावर २०१० पर्यंत झालेल्या दहा दहशतवादी हल्ल्यात तब्बल पाचशे लोकांचे बळी गेले. जखमींची संख्या हजारांपेक्षा अधिक आहे. तरीही त्यास जबाबदार असलेल्यांना जबरी शिक्षा दिल्याचे दिसत नाही. दहशतवाद्यांबरोबर झालेल्या चकमकीत दोन्ही बाजूंचे नुकसान होते. जे पकडले जातात, त्यांच्यावरील खटले वर्षानुवर्ष चालतात. दरम्यान, हल्ले होत असतात. देशाचा प्रवास एका हल्ल्यापासून दुसऱ्या हल्ल्याकडे चाललेला असतो. अधुनमधून जनतेचा निर्धार, तिचे शौर्य, धीरोदात्तपणा यांचे सरकार व राजकीय नेत्यातर्फे कौतुक होते. परंतु, ज्यांची मुले, आप्त, नातेवाईक यांचा बळी गेलेला असतो, त्यांची वैयक्तिक हानी कधीही भरून येणारी नसते. वातावरण उद्विग्न असते. हे कधी संपणार की नाही, सरकार त्यावर जालीम उपाय करणार, की नाही, या प्रश्नांवर उलटसुलट चर्चा चालू असतानाच पुन्हा भारत पाकिस्तान वाटाघाटींकडे नेते वळले आहेत.

गेली काही महिने पंतप्रधानांच्या कार्यालयासह, परराष्ट्र,



*बॉम्बस्फोटानंतर जर्मन बेकरीची झालेली दुर्दशा.*

गृह, अर्थ, कृषि, व पर्यावरण या खात्यांचे मंत्री सातत्यानं चर्चेत आहेत. ही सारी खाती महत्वाची आहेत. निरिक्षकांच्या मते, डॉ मनमोहन सिंग हे वरकरणी शांत व मितभाषी असले, तरी जिद्दी आहेत व एकदा त्यांनी ठरविले, की तो निर्णय तडीस नेल्याशिवाय ते राहात नाही. उदा. अमेरिकेबरोबर नागरी अणु उर्जा करार करण्याचा अमेरिकेचे माजी अध्यक्ष जॉर्ज डब्ल्यु बुश यांच्याबरोबर २००५ साली झालेला समझोता व निर्णय युपीए क्रमांक-१ मध्ये डाव्यांचा विरोध होऊनही अखेर त्यांनी तडीस नेला. तसेच, आता भारत-पाकिस्तान चर्चेबाबत त्यांनी करावयाचे ठरविलेले दिसते. याचा अर्थ शर्म-अल-शेख येथे जारी करण्यात आलेल्या जाहीरनाम्यातील ''दहशतवाद चालू असला, तरी समांतर वाटाघाटी करावयाच्या,'' हे वाक्य व भूमिका ते प्रत्यक्षात आणण्याची शिकस्त करणार. गेली साठ वर्षे भारत व पाकिस्तानमधील वैमनस्य व काश्मीरचा वाद संपुष्टात आलेला नाही. पाकप्रणित दहशतवाद काकणभरही कमी होण्याची शक्यता नाही, हे ठाऊक असूनही भारतीय उपखंडात शांततेच्या दिशेने प्रयत्न करणारा एक 'महान नेता', हा आपल्या प्रतिमेचा ठसा ते राजकीय इतिहासावर उमटवू पाहात आहेत. किंबहुना, ''त्याच जिद्दीने त्यांची पावले पडणार,'' असे सरकारी वर्तुळातून बोलले जाते. परंतु, त्यांचे यश अखेर पाकिस्तानच्या सहकार्यावर, व पाकिस्तानने भारताची भूमिका समजावून घेण्यावर अवलंबून राहील. यात अनेक 'जर-तर' चे अंतर आहे. हे तेही जाणून आहेत. भारतीय उपखंडात आपण सर्वात शक्तीशाली व मोठा देश असल्याने पाकिस्तान बरोबर गेली चौदा महिने चर्चा न करण्याच्या भूमिकेमुळे एक 'ताठर देश' अशी भारताची प्रतिमा आंतरराष्ट्रीय पटलावर निर्माण झाली आहे. ती त्यांना दूर करावयाची आहे. सचिव पातळीवरील चर्चेचा मार्ग त्यांनी काढलाय, तो त्यासाठीच.





*बॉम्बस्फोटानंतर केंद्रीय कृषीमंत्री शरद पवार यांनी हॉस्पिटलमध्ये जाऊन जखमींची विचारपूस केली.*




२६ नोव्हेंबर २००८ रोजी मुंबईवर झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर ''पाकिस्तानने काही प्रमाणात 'सकारात्मक' कारवाई केली,'' असा दावा सरकारतर्फे करण्यात आला. तथापि, त्यावर कुणाचाही विश्वास बसलेला नाही. पाकिस्तानने सकारात्मक असे नेमके काय केले, याचे कोणतेही समाधानकारक स्पष्टीकरण परराष्ट्र मंत्रालयाने दिलेले नाही. पाकिस्तानने पुढाकार घेऊन कारवाईबाबत पारदर्शक दाखविलेली नाही. उलट पाकिस्तान व पाकव्याप्त काश्मीरमधून दहशतवादी संघटनांचे म्होरके रोज भारताविरूद्ध डरकाळ्या फोडत आहेत. ''हे 'नॉन स्टेट ॲक्टर्स' आमच्या आवाक्याबाहेर आहेत,'' असा कांगावा पाकिस्तानचे नेते सातत्याने करीत असतात. या परिस्थितीला कोणतेही परिणामकारक उत्तर सरकारकडे नाही, असेच सातत्याने दिसून येते. त्यामुळेच चीन व अमेरिकेचा पाठिंबा असणाऱ्या पाकिस्तानचे फावते आहे. ''पाकिस्तान हे कोलमडलेले राष्ट्र (फेल्ड स्टेट) आहे,'' असे आपण भलेही म्हणोत, परंतु त्या स्थितीतही शिष्टाईच्या क्षेत्रात व दहशतवादी कारवायात, भारतावर कुरघोडी करण्याची कोणतीही संधि पाकिस्तानने सोडलेली नाही. म्हणूनच, दोन्ही देशांच्या नागरिकांना शांतता हवी असली, तरी चर्चेच्या प्रक्रियेतून ती नजिकच्या भविष्यकाळात प्रस्थापित होण्याची शक्यता नाही. याचे प्रमुख कारण म्हणजे, भारतासाठी असलेला 'कोअर इश्यू' दहशतवाद व 'काश्मीर हाच' आमचा कोअर इश्यू' असा पाकिस्तानने जाहीर केलेला दावा. परराष्ट्र मंत्री एस.एम. कृष्णा यांनी 'सीएनएनआयबीएन' वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत, 'सर्वसमावेशक वाटाघाटी' करण्याचा पाकिस्तानचा मुद्दा फेटाळून लावल्याने परराष्ट्र सचिव श्रीमती निरूपमा राव व पाकिस्तानचे परराष्ट्र सचिव सलमान बशीर यांच्या दरम्यानची चर्चा 'ब्रेकींग द आईस' या स्वरूपाची ठरली, तर आश्चर्य वाटू नये.

पुण्यातील हल्ल्यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, की लष्कर-ए-तैय्यबा उर्फ जमात उद दवाचे म्होरके आता आपले लक्ष्य पाकिस्तानच्या सुरक्षित वातावरणात राहून इंडियन मुजाहिदीनच्या हस्तकांतर्फे तडीस नेत आहेत. त्यामुळे पोलीस अथवा लष्करी कारवाईत ठार झाले तर ते इंडियन मुजाहिदीन, व कातडी वाचेल ती पाकिस्तानात आश्रय मिळालेल्या दहशतवादी म्होरक्यांची. किंबहुना अशीच योजना असावी. हे 'दुहेरी प्रॉक्झी वॉर' झाले. दहशतवादी संघटनातील नवीन प्रवाह म्हणजे, अनेक शिक्षित मुस्लिम युवक त्यात रोज प्रवेश करीत



*भारताच्या परराष्ट्र सचिव निरुपमा राव व पाकिस्तानचे परराष्ट्र सचिव सलमान बशीर हस्तांदोलन करताना.*



आहेत. देशातील अनेक बाँबस्फोटातील संशयितांची यादी पाहिली, की त्याची खात्री पटते. हे सारे फरार आहेत. त्यातील इक्बाल भटकल हा युनानी डॉक्टर आहे, तर अबू रशिद आय टेस्टर, रियाझ इस्माईल हा बीई. सिव्हिल, अब्दुल्ला अख्तर हा बीएससी फार्मा, मिर्झा शादाब हा बीई इलेक्ट्रॉनिक्स पदवीधर, अरिज खान, अभियांत्रिकीचा अनुत्तीर्ण विद्यार्थी व बडा साजिद प्रशिक्षित दहशतवादी आहे. या संघटनात वर्षाकाठी अशा अनेक सुशिक्षितांची भर पडतेय. त्यामुळे दहशतवादी कारवायांची योजना, सूत्रचालन आदींना संगणक व अत्याधुनिक हत्यारे वापरणारे तंत्रज्ञ यांची मदत मिळत आहे. दहशतवाद 'हायटेक' बनला आहे. त्याचा मुकाबला करण्यासाठी भारतालाही प्रतिकार व प्रतिबंधात्मक हायटेक यंत्रणा तयार करावी लागेल. त्यासाठी वेळ पडल्यास लष्कराला साह्य करणाऱ्या डीआरडीओ (डिफेन्स रिसर्च अँड डेव्हलपमेन्ट ऑर्गनायझेशन) चे सहकार्य घ्यावे लागेल. सीमेवर वर्षातील ३६५ दिवस २४ बाय ७ पहारा ठेवणारे सीमासुरक्षा दल व



*अतिरेकी लष्कर-ए-तैय्यबाचे त्यांना आसरा पाकिस्तानचा*






*अतिरेकी छावणीत निर्धार व्यक्त करताना*



सागरी सीमेची टेहाळणी करणारे तटरक्षक दल यांना सक्रीय व अधिक कार्यक्षम करावे लागेल. दरम्यान, गेल्या महिन्यात दिल्ली पोलिसांच्या हातावर तुरी देऊन गुरू नानक नेत्र रूग्णालयातून फरार झालेल्या अब्दुल रझाक, महंमद सादिक व रफाकत अली या तीन दहशतवाद्यांचा अद्याप थांगपत्ता लागलेला नाही. ते इंडियन मुजाहिदीनला सामील होण्याची शक्यता वर्तविली जाते. दहशतवादी हल्ल्यांचे गंडांतर आता पर्यटन, क्रीडा क्षेत्र यावर येऊ लागले असून, त्याचा थेट परिणाम देशाची सुरक्षाविषयक प्रतिमा व आर्थिक परिस्थितीवर होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. हॉकी वर्ल्ड कप, आयपीएल सामने, राष्ट्रकुल क्रीडास्पर्धाबाबत खेळाडूंना मिळणाऱ्या धमक्या हा त्याचाच भाग होय. हे पाहाता आता पी.चिदंबरम यांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे.

## नक्षलवाद

पाकप्रणित दहशतवादाबरोबरच नक्षलवाद्यांनी अंतर्गत सुरक्षेबाबत केंद्र सरकारसह बिहार, झारखंड, छत्तीसगढ, महाराष्ट्र व आंध्र प्रदेश या राज्यांपुढे मोठे आव्हान निर्माण केले आहे. माओवादी नेते व कम्युनिस्ट पक्ष(माओवादी) च्या पॉलिटब्युरोचे सदस्य कोबाड घांडी यांच्याविरूद्ध दिल्लीतील दंडाधिकारी



*हल्ले करणाऱ्या नक्षलवाद्यांकडे अद्यावत हत्यारे असून त्यांना यासंबंधीचे प्रशिक्षण दिले जाते.*

कावेरी बवेजा यांच्या न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या सातशे पानी आरोप पत्रातील तपशील घांडी यांच्या कार्याचे जाळे किती विस्तारलेले आहे, हे दर्शवितो. नक्षलवादी चळवळीला सैद्धांतिक बैठक देण्याचे काम ते अनेक वर्ष करीत आहेत. बंदी घातलेल्या कोणत्या संघटनांना सरकार नेस्तनाबूत करणार आहे, याविषयीच्या गोपनीय अहवालाची प्रतही त्यांच्याकडे होती. ''नक्षलवादी चळवळ ही सरकारने आदीवासी जाती जमातीकडे वर्षानुवर्ष दुर्लक्ष केल्याने फोफावली, व समस्या सोडवायची असेल, तर त्याकडे मानवीय दृष्टीनेच पाहावे लागेल,'' असे चळवळीचे अभ्यासक व आंध्रचे प्रसिद्ध वकील व पीपल्स युनियन ऑफ सिव्हिल लिबर्टीजचे अध्यक्ष के.जी.कन्नीबरन, समर्थक वरवरा राव व गौतम नवलखा यांचे मत आहे. ''बंदुकीला बंदुकीने उत्तर देऊन प्रश्न सुटणार नाही,'' असा युक्तीवाद ते करतात, ''आदिवासींच्या नावाखाली त्यांनाच ढाल बनवून माओवादी व नक्षलवादी सशस्त्र क्रांतिचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी हिंसाचार घडवून आणीत आहेत,'' असा दुसरा युक्तिवाद आहे. कोबाड घांडी यांनी अटकेत असताना


भारतीय जवानांनी अतिरेक्यांच्या छावण्यांवर हल्ले करून ताब्यात घेतलेली अद्यावत शस्त्रास्त्रे.


चंदनतस्कर वीरप्पन

पुष्पकमल दहल उर्फ प्रचंड

कोबाड घांडी

दिलेल्या जबानीवरून त्यांना झारखंडमधील फ्रान्सिस इंदुवार याचे अपहरण व खून यांची माहिती होती. तसेच माओवाद्यांमधील मतभेद संपुष्टात आणण्यासाठी घांडी यांनी नेपाळचे माओवादी नेते व माजी पंतप्रधान पुष्प कमल दहल उर्फ प्रचंड यांची भेट घेतली होती, असे सिद्ध होते. झारखंडमध्ये डिसेंबर २००६ व एप्रिल २००७ मध्ये झालेल्या नक्षलवादी हल्ल्यात आपला सहभाग होता, याची कबुली त्यांनी आंध्रप्रदेश पोलिसांपुढे यापूर्वीच दिली आहे. नक्षलवादी चळवळीला पाठिंबा मिळावा, यासाठी त्यांनी बेल्जियम व नेपाळला भेटी दिल्या व पोलिसांना गुंगारा देण्यासाठी त्यांनी तेरा वेळा आपली नावे बदलली. दिल्ली पोलिसांच्या माहितीनुसार,'' माओवाद्यांनी लोकांना धाकदपटशा दाखवून सुमारे १५ ते २० कोटी रू. चा निधी जमविला आहे.''

माजी गृहमंत्री शिवराज पाटील यांनी नक्षलवाद्यांचे ''आपली मुलेच आहेत,'' असे वर्णन राज्यसभेतील एका चर्चेला उत्तर देताना केले होते. पी.चिदंबरम तशी भाषा करीत नाही. ''माओवाद्यांनी हिंसाचार सोडला, तर आदिवासी भागाचा विकास करण्याची तरतूद केंद्र सरकार करील,'' असे १९ फेब्रुवारी रोजी एका वार्तालापात दिल्ली येथे त्यांनी सांगितले. ''७२ तासात हिंसाचार सोडा, आम्ही मार्ग काढू,'' असेही आवाहन चिदंबरम यांनी केले. इतिहासाकडे पाहाता असे दिसते, की तीन दशकांपूर्वी पश्चिम बंगालच्या नक्षलबारी भागात सुरू झालेल्या हिंसाचार व उपद्रवामुळे त्या राज्यातून उद्योगधंद्यांनी पलायन केले होते. त्यामुळे औद्योगिक प्रगतीच्या दृष्टीने तामिळनाडू, गुजरात, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यांच्या मानाने पश्चिम बंगाल मागास राहिला. माओवाद्यांबाबत तेथील

डाव्या आघाडी सरकारचा 'सॉफ्ट कॉर्नर' होता. तेच माओवादी आता सरकारवर उलटले आहेत. पश्चिम बंगालमध्ये गुंतवणूक करण्यास उद्योजक आजही धजावत नाही, याचे कारण, कामगारवर्गावर डाव्यांची असलेली पकड व उद्योगाला पोषक नसलेले वातावरण. मुख्यमंत्री बुद्धदेव भट्टाचार्य या परिस्थितीत परिवर्तन घडवून आणू शकले नाही. मध्य प्रदेशातील बस्तर, महाराष्ट्रातील गडचिरोली, भामरागड परिसर यातही नक्षलवाद्यांच्या प्रभावामुळे प्रगती झालेली नाही. आंध्र प्रदेशात त्यांना प्रमुख राष्ट्रीय प्रवाहात आणण्याचा काँग्रेसचा प्रयत्न फसला. तेलंगणा राष्ट्र समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर राव यांच्यावरही त्यांचा दबाव आहे. नक्षलवाद्यांचे तंत्र चंदनचोर वीरप्पनसारखे आहे. पोलिस अधिकाऱ्यांना पळविणे, त्यांना ओलीस ठेवणे, पोलिस ठाण्यांवर हल्ले करून त्यांची शस्त्रास्त्रे हडप करणे इ. अलीकडे झारखंडचे मुख्यमंत्री शिबू सोरेन यांनी विभागीय विकास अधिकाऱ्याला सोडविण्याच्या बदल्यात काही महिला माओवादींना मुक्त केले. ''संबंधित निर्णय राज्य सरकारचा आहे,'' असे चिदंबरम यांनी म्हटले असले, तरी अनेक राज्यात नक्षलवाद्यांचे 'पर्यायी राज्य' कसे प्रस्थापित झाले आहे, हे ही त्यावरून सिद्ध होते.

सिल्दावरील हल्ल्यापाठोपाठ माओवाद्यांनी बिहारमधील जामुई जिल्ह्यात फुलवारी येथे हल्ला करून १२ जणांना ठार केले व ४० घरांना आगी लावल्या. एका वृत्तानुसार, ''झारखंडमधील गिधौर, भिमबंड, व पार्श्वनाथ हा सारा परिसर सशस्त्र नक्षलवाद्यांचा अड्डा बनलाय. बिहारच्या ३८ जिल्ह्यांपैकी ३१ जिल्ह्यात नक्षलवाद्यांचे प्राबल्य असून त्यापैकी १६ जिल्हे अतिसंवेदनशील आहेत.'' तात्पर्य, केंद्राने सुरू केलेले ऑपरेशन 'ग्रीन हंट' यशस्वी व्हावयाचे असेल, तर केंद्र व राज्य सरकारच्या गुप्तचर व पोलीस यंत्रणात समन्वय हवा. ''केंद्रीय गुप्तचर संघटनांनी हल्ल्यांच्या पूर्व सूचना देऊनही राज्यपातळीवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली नाही,'' असा ठपका अलीकडे चिदंबरम यांनी पश्चिम बंगाल व बिहार सरकारवर ठेवलाय. नक्षलग्रस्त राज्यांच्या मुख्यमंत्र्यांबरोबर गृहमंत्र्यांची कोलकता व दिल्ली अशी दोन वेळा चर्चा झाली. तथापि, नजिकच्या भविष्यकाळात माओवादी नेत्यांबरोबर थेट चर्चा होण्याची शक्यता नाही.

## तेलंगणा

तेलंगणा निर्मितीचे घोंगडे भिजत पडणार, असे दिसते. सरकारने श्रीकृष्ण आयोग नेमलाय. त्यातून काय निष्पन्न होईल, ते होवो, परंतु विजयवाडा मतदार संघातील लोकसभेचे संसद सदस्य एल. राजगोपाल म्हणतात, ''तेलंगणा निर्मितीच्या संदर्भात विधानसभेत ठराव व्हावयास हवा, असे केंद्राचे म्हणणे आहे. परंतु दोन्हीबाजू (तेलंगणाचे विरोधक व समर्थक) इतक्या अटीतटीला पोहोचल्या, की सभापटलावर त्यांचे एकमत होण्याची सुतराम शक्यता नाही.'' त्यांनी तयार केलेल्या एका टिपणात राज्यनिर्मितीच्या संदर्भात संसदेत अनेक वर्षांपूर्वी झालेल्या चर्चेत इंदिरा गांधी यांनी केलेल्या भाषणाचा उल्लेख आहे. त्यावेळी इंदिराजी म्हणाल्या होत्या, की राज्यनिर्मितीची मागणी करताना मागासलेपणाशी कुणाचे हितसंबंध निगडीत होता कामा नये, अथवा मागासलेपण हेच राज्यनिर्मितीचे एकमेव कारण ठरू नये. प्रत्यक्षात तेलंगणाचे मागासलेपण, हाच मुद्दा बनलाय. त्यावरून दिवसेंदिवस भावना उद्रेक होत आहे. २० फेब्रुवारी रोजी उस्मानिया विद्यापिठाच्या शेकडो विद्यार्थ्यांनी हैद्राबादमध्ये केलेले प्रक्षोभक आंदोलन, हा त्याचाच भाग होय. विधानसभेचे अधिवेशन सुरळीतपणे चालू राहाण्यासाठी मुख्यमंत्री के रोसैय्या यांच्या सरकारला ३० हजार पोलिसांची मदत घ्यावी लागावी, यावरून तेथे झालेला कायदा व सुव्यस्थेचा बोजवारा ध्यानात येतो. असेच चालू राहिले, तर संगणक उद्योगाची 'पंढरी' म्हणून असलेली हैद्राबादची ख्याती संपुष्टात येण्यास वेळ लागणार नाही.



*तेलंगणा राष्ट्र समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर राव जनसमुहापुढे बोलताना.*

# दरवाढ

जीवनावश्यक वस्तूंचे भाव येत्या एप्रिलपासून कमी होतील, असे भाकित केंद्र सरकारतर्फे करण्यात येते. २२ फेब्रुवारीपासून सुरू झालेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विरोधकांचा घणाघाती हल्ला सहन करीत या मुद्यांवर सरकारला तारेवरची कसरत करावी लागेल. दरम्यान, पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस, युरिया व अन्य खते आदींच्या किमतीत वाढ झाल्यास त्याचा 'डोमिनो इफेक्ट' आम आदमीवर होणार, हे निश्‍चित. त्याचे निराकरण पंतप्रधान डॉ मनमोहन सिंग, कृषिमंत्री शरद पवार व अर्थमंत्री प्रणव मुकर्जी किती समाधानकारकरित्या व प्रभावीपणे करतात, यावर सरकारची प्रतिमा अवलंबून राहील. येत्या ऑक्टोबरात बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका होत असून, त्यापाठोपाठ २०११ मध्ये पश्‍चिम बंगाल विधानसभेच्या निवडणुका होतील. काँग्रेस, भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय जनता दल, जनशक्ती पक्ष, डावी आघाडी व तृणमूल काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यासाठी अटीतटीच्या ठरतील.

# गडकरी यांचा वेगळा सूर

दरम्यान, इंदूर येथे झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या खुल्या अधिवेशनात अध्यक्ष नितीन गडकरी यांनी अल्पसंख्यांकांना चुचकारून वेगळा सूर आळवलाय. राम मंदिर उभारणीसाठी त्यांनी मुस्लिमांना मदतीचे आवाहन केले. रामजन्मभूमीशेजारी मशीद बांधून देण्याचे आश्‍वासन दिले. माजी अध्यक्ष लालकृष्ण अडवानी व शिवसेनेचे अध्यक्ष बाळासाहेब ठाकरे यांच्या कट्टरतेला छेद दिला. एकमेकांवर कुरघोडी करणाऱ्या ज्येष्ठ नेत्यांनाही कानपिचक्या दिल्या. अडवानी व माजी पंतप्रधान अटल बिहारी वाजपेयी या दोघांनाही नवनवीन चित्रपट पाहाण्याचा जसा शौक होता, तसा गडकरी यांना गाण्याचा शौक असल्याने त्यांचे 'जिंदगी कभी तो हसाए, कभी तो रूलाए' हे गीत हिट ठरले. भाजपमध्ये गडकरी 'जान' फुंकतील, असा विश्‍वास अनेक नेत्यांना वाटतो. तरीही पक्षाचे संचालन करताना त्यांना अडवानी, सुषमा स्वराज, माजी अध्यक्ष राजनाथ सिंग, अरूण जेटली आदी ज्येष्ठ नेत्यांची मर्जी राखावी लागेल. बिहारमध्ये जनता दल व भाजपचे युतीचे राज्य आहे, ते टिकून ठेवण्याचे प्रयत्न करावे लागतील. त्यांचे दलित वस्तीत जाणे, त्यांच्याबरोबर जेवण करणे हे राहुल गांधी यांचे अनुकरण वाटत असले तरी काँग्रेस व भाजप या दोघांनाही आज अल्पसंख्याक व दलित मतांची गरज आहे, हे नाकारता येणार नाही. वाजपेयी यांच्या कारकीर्दीत भाजपने 'शायनिंग इंडिया'चा नारा दिला व पक्षाचा पराभव झाला. गडकरी यांना २०१४ मध्ये भाजपला केंद्रात सत्तेवर बसविण्यापूर्वी भाजपला चमकवावे लागेल, विश्‍वासार्हता निर्माण करावी लागेल. त्यासाठी पुढील चार वर्षांचा अवधी त्यांना मिळालेला आहे. त्यांचे युवा नेतृत्व कोणती किमया करते, याकडे मतदाराचेही लक्ष लागलेले असेल. आपण 'लाफिंग बुद्धा' ठरणार नाही, याचीही खबरदारी गडकरी यांना घ्यावी लागेल. कट्टर हिंदुत्वाच्या मुद्यापासून ते काहीसे दूर झाले असून, सामाजिक समानता व विकास, गरीबांचे कल्याण या मुद्यांवर त्यांचा भर असल्याने त्यांच्या नेतृत्वाखाली भाजपचा मतदार संघ विस्तारणार, असा अंदाज निरिक्षक व्यक्त करतात. त्यांच्या नेतृत्वक्षमतेबाबत निष्कर्ष काढण्यास आणखी काही काळ जाऊ द्यावा लागेल.




# समस्यांचा भोवरा व हलके-फुलके क्षण

समस्यांचा भोवऱ्यात राजकारण फिरत असूनही राजधानीत भेटी-गाठी, हास्यविनोदाचे अनेक क्षण येत आहेत. अर्थसंकल्पीय अधिवेशनाआधी सुरू झालेल्या भोजनावळीत पहिले आंध्र पद्धतीचे खास भोजन अलीकडे आयोजित केले होते, ते नागरी विकास मंत्री जयपाल रेड्डी यांनी. त्यावेळी चर्चा होती,




'न्यूज पॅकेज', अथवा 'पेड न्यूजची.' वृत्तपत्रांचे मालक व राजकीय नेते यांच्यातील संगनमत संपुष्टात आले, तरच यातून मार्ग निघेल, असा त्यांचा निष्कर्ष. तसेच निवडणूक आयोग या प्रवृत्तीला वेसण घालू शकतो, यावरही एकमत झाले. नंतर, काँग्रेसचे प्रवक्ते अभिषेक मनु सिंघवी व दुसरे प्रवक्ते मनीष तिवारी यांनी प्रतिष्ठित इंडिया इंटरनॅशनल सेंटरच्या हिरवळीवर पत्रकारांसाठी एका मागून एक दोन भोजने आयोजित केली. भोजनात गराडा पडला, तो पक्षाध्यक्ष सोनिया गांधी यांचे राजकीय सल्लागार अहमद पटेल व काँग्रेसच्या मिडिया विभागाचे प्रमुख जनार्दन द्विवेदी यांच्या भोवती. अशा प्रसंगी, हसी मजाक करताना काही बातमी निघते काय, याकडे प्रत्येकाचे लक्ष असते. पटेल बऱ्याच वेळा वेळ मारून नेतात. पण २१ फेब्रुवारी रोजी नभोवाणी मंत्री अंबिका सोनी यांच्या निवासस्थानी ते आले, तेव्हा ''काँग्रेसच्या पदाधिकाऱ्यांत केव्हा फेरबदल होणार,'' असे विचारता, ते म्हणाले, की लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर फेरबदल होणार होता. परंतु, त्यानंतर महाराष्ट्र व अन्य राज्यात झालेल्या विधानसभेच्या निवडणुका, आंध्रप्रदेशचे नेते माजी मुख्यमंत्री राजशेखर रेड्डी यांचा अपघाती मृत्यू , तेलंगणातील आंदोलन, यामुळे प्रत्येक वेळी तो पुढे ढकलण्यात आला. ''

उद्यापासून संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होतय, तेव्हा आणखी काही महिने लागणार.'' ''अधिवेशनात बराच गदारोळ होणार'', असे सांगता पटेल म्हणाले, ''३ मार्च पर्यंत खऱ्या अर्थाने संसदेचे अधिवेशन सुरू होईल, असे दिसत नाही. आम्ही त्याची तयारी ठेवली आहे. पर्यावरण मंत्री जयराम रमेशही होते. त्यांना अलीकडे 'ब्रिंजलराम' म्हणतात. बीटी वांग्याबाबत जो वाद झाला, त्यावरून त्यांचे हे नाव पडले आहे. भाषक वृत्तपत्रांबाबत ते बरेच कडवटपणे बोलले. ते म्हणाले, की बीटी वांग्याबाबत सात सभा घेऊन लोकांना पटविण्याचा प्रयत्न मी केला. ''परंतु मला कोणत्याही भाषिक वृत्तपत्राने पाठिंबा दिला नाही. एवढेच नव्हे, तर केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीतही पृथ्वीराज चव्हाण यांच्यासह अन्य काही मंत्र्यांनी विरोध दर्शविला. पुढे काय होणार मला ठाऊक नाही. तो कॅबिनेटपुढे पुन्हा उपस्थित करण्याची माझी तयारी आहे, परंतु पंतप्रधानांनी मला अद्याप त्याबाबत काही सांगितलेले नाही.''

या विरोधामागे बियाणे तयार करणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्या आहेत, असाही सूर होता. पंतप्रधानांचे तपमानबदल विषयक खास दूत शाम सरण यांचा राजीनामा व मतभेदांबाबत विचारता, '' मला काही ठाऊक नाही,'' असे ते म्हणाले.

अन्नप्रक्रिया मंत्री सुबोधकान्त सहाय मंत्रिमंडळात झालेल्या दरवाढीच्या चर्चेबाबत सांगू लागले. ते म्हणाले, ''भाववाढीमुळे शेतकऱ्यांना चांगले भाव मिळत आहेत, असे एका मंत्र्याने सांगता, पंतप्रधान म्हणाले, ''ते ठीक आहे, ग्राहकांचे काय, त्यांनाही माफक दरांत धान्य व जीवनावश्यक वस्तू मिळाल्या पाहिजे.'' सहाय यांच्यामते, ''युरियाच्या किमती दहा टक्क्याने वाढविण्याबाबत निर्णय झाला असला, तरी ही टक्केवारी पाच टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता नाकारता येत नाही.'' ''अन्न प्रक्रिया खात्याकडे व उद्योगाकडे कुणाचेही लक्ष नाही, की त्यात गुंतवणूक करण्यासाठी खासगी कंपन्या पुढाकार घेत नाही,'' अशी त्यांची खंत.

ते बोलत असताना परराष्ट्र राज्यमंत्री शशी थरूर यांनी नाट्यमय प्रवेश केला. परराष्ट्र मंत्रालय विरूद्ध ब्रिटिश उच्चायुक्त संघांचा क्रिकेटचा सामना जिंकल्याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर होता. थेट मैदानावरून आल्याने त्यांचे कपडेही मैदानातील होते. डोक्यावर लाल हॅट होती. ''ब्रिटिश संघाच्या दोन विकेट मी घेतल्या,'' असे ते म्हणाले. जयपाल रेड्डी व सलमान खुर्शिद यांनीही वर्णी लावली. अंबिका सोनी यांनी हे भोजन का आयोजित केले, याच्या अटकळी लावल्या जात होत्या.

पंतप्रधानांनी काही दिवसांपासून प्रत्येक मंत्रालयाच्या कामकाजाचा आढावा घेण्यास सुरूवात केली आहे. त्यात ''नभोवाणी मंत्रालयाला चांगले मार्क मिळालेले नाही,'' असे वृत्त ज्या दिवशी प्रसिद्ध झाले, त्याच सायंकाळी सोनी यांच्या कार्यालयाकडून निवडक पत्रकारांना भोजनाच्या आमंत्रणाचे एसएमएस पाठविण्यात आले. प्रतिमा सुधारण्याचा हा एक मार्ग असावा. सोनी राजकारणात मुरलेल्या. संघटनात्मक कार्यात त्यांना रस आहे. मंत्रिपदाची जबाबदारी दिल्यानंतर त्यांची लक्षणीय अशी कामगिरी अद्याप दृष्टीपथात आलेली नाही. शिवाय हे मंत्रालय चालविणे तसे नाजुक काम असते. ते मात्र त्या शिताफीने पार पाडीत आहेत. त्यांच्या २२ अकबर मार्गावरील भोजनाला अभिनेत्री शर्मिला टागोर व नंदिता दास यांच्या उपस्थितीने मात्र रुपेरी दुनियाची झलकही निमंत्रितांच्या अनुभवास आली.!!!

# प्रणबबाबूंना विरोधकांचा घेरा

अर्थमंत्री प्रणब कुमार मुकर्जी यांनी २६ फेब्रुवारी रोजी मांडलेल्या २०१०-११ च्या अर्थसंकल्पातील पेट्रोल व डिझेलच्या भाववाढीचा निषेध करीत डॉ मनमोहन सिंग यांच्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष व बहुजन समाज पक्षासह तमाम विरोधकांनी सभात्याग केला. संसदेच्या इतिहासातील हा पहिला प्रसंग होता. अर्थसंकल्पात अर्थव्यवस्थेला प्रगतीपथावर नेणाऱ्या अनेक योजना व उपक्रम असले, तरी सरकारपेक्षा विरोधकच 'आम आदमी'ची साथ देत आहेत, असे चित्र निर्माण झाले. बसपा, राष्ट्रीय जनता दल, समाजावादी पक्ष, डावी आघाडी व भाजप यांची सभापटलावरील एकजूट दरवाढ विरोधी आंदोलनात दिसणार काय, हे लौकरच कळेल. परंतु विरोधकांचे ऐक्य पाहाता व भाजपने अर्थसंकल्पावर कपात ठराव मांडण्याचा इशारा दिल्याने काँग्रेसमध्ये चलबिचल सुरू झाली व बेरीज वजाबाक्या केल्या जाऊ लागल्या. पंतप्रधानांच्या कार्यालयातील मंत्री व विज्ञान व तंत्रज्ञान खात्याचे मंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या खिशात असलेल्या कागदावर आकडेवारीचा हिशेब होता. ते म्हणाले, ''सारे विरोधक एकत्र झाले व या विषयावर मतदान झाले, तरी सरकारला २७६ खासदारांचा पाठिंबा मिळेल. सरकार धोक्यात येण्याची शक्यता नाही.'' मधु कोडा व समाजवादी पक्षाच्या सदस्य अभिनेत्री जयप्रदा यांचा पाठिंबा सरकारने गृहीत धरलाय.

रेल्वे अर्थसंकल्पाची 'ममता एक्स्प्रेस' सवंग लोकप्रियतेच्या दिशेने निघाल्याचे रेल्वेमंत्री ममता बॅनर्जी त्यांनी २४ फेब्रुवारी रोजी सादर केलेल्या रेल्वे अर्थसंकल्पावरून स्पष्ट झाले. पण त्यातही पश्चिम बंगालसाठी अनेक योजना जाहीर करण्यामागे त्यांचा रोख होता तो, तेथे २०११ मध्ये होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकांकडे. तज्ञांच्या मते, 'ममता एक्स्प्रेस'चा प्रवास रेल्वेला गोत्यात आणणार. कारण 'आमदनी अठन्नी खर्चा रूपय्या' या म्हणीप्रमाणे नफ्याकडे दुर्लक्ष केले आहे. प्रवासी भाड्यात त्यांनी वाढ केलेली नसली, तरी प्रणब मुकर्जी यांनी केलेल्या इंधन भाववाढीचा फटका त्यांना सहन झालेला नाही. दरम्यान, दरवाढीतून माघार नाही,' असे ठामपणे सांगणारे प्रणबबाबू आता बरेचसे निवळले असून अर्थसंकल्पावर संसदेचे शिक्कामोर्तब होण्यापूर्वी दरवाढीबाबत मुकर्जी एक पायरी उतरतील, अशी दाट शक्यता दिसते.

अर्थसंकल्प अर्थातच सर्वांना खुष करणारा नाही व तसा तो असावयास नको. आर्थिक परिस्थितीवर येणाऱ्या संभाव्य

समस्यांची योग्यपणे हाताळणी करण्यासाठी सरकारची दिशा स्पष्ट करणारा तो असावयास हवा. तसा तो आहे. मध्यमवर्गीयांसाठी बचतीची मर्यादा १ लाख रू वरून १ लाख २० हजार रू. करून त्यांनी त्यांची क्रयशक्ती निश्चितच वाढविली.



त्यामुळे वस्तूंची मागणी वाढून उत्पादनाला चालना मिळेल. दुसरीकडे, सेवा व वस्तू कर लागू करण्याची मुदत आता एप्रिल २०११ पर्यंत पुढे ढकलण्यात आली. २७ फेब्रुवारी रोजी उद्योगपती व निरनिराळ्या चेम्बर्स ऑफ कॉमर्सच्या प्रतिनिधींपुढे बोलताना, मुकर्जी यांनी चलनवाढीचा (०.४०) टक्के धोका पत्करल्याचे कबुल केले. परंतु ती नियंत्रणाखाली आणता येईल, असाही विश्वास व्यक्त केला. अन्नधान्याची चलनवाढ १७ टक्क्यावर जाऊन पोहोचली आहे. ती एक अंकी करण्याचे मोठे आव्हान देशापुढे आहे. म्हणूनच अर्थसंकल्प सादर करताना त्यांनी पर्जन्य देणाऱ्या इंद्रदेवाची प्रार्थना केली. ते म्हणाले, की आर्थिक प्रगतीचा वेग ९ टक्क्यांवर नेणे, प्रगती अधिक सर्वसमावेशक करणे व शासनप्रक्रिया अधिक कार्यक्षम करणे, ही तीन आव्हाने सरकारपुढे आहेत. सरकार साऱ्या गोष्टी करू शकेल, असे नाही. ''व्यापार व उद्योगास सरकार पोषक वातावरण निर्माण करील. त्याला प्रतिसाद देण्यासाठी उद्योगक्षेत्राने पुढे आले पाहिजे.''

विज्ञानभवनातील उद्योगपतींच्या प्रतिनिधींपुढे बोलताना त्यांचा स्वर आश्वासक होता, तरीही वस्तुस्थितीची जाणीव त्यांना होत आहे. ते म्हणाले, ''माझे वय आता ७५ झाले आहे. ''माय डेज आर नंबर्ड'' परंतु देशाच्या युवा पिढीवर माझा विश्वास आहे. त्यांच्यावर इतिहासाचे ओझे नाही. आपली संस्कृती हजारो वर्षांची असली, तरी तरूणांची सर्वात मोठी लोकसंख्या देशात आहे. त्यांची विचारसरणी ताजीतवानी तर आहेच, परंतु आव्हाने झेलण्याची ताकदही त्यांच्यात आहे.''

केंद्रीय मंत्रिमडळातील एक अत्यंत हुशार, विलक्षण स्मरणशक्ती व तल्लख बुध्दी असलेले, कोणत्याही खात्याचा कारभार अत्यंत कार्यक्षमतेने चालविणारे मंत्री अशी प्रणबजींची ख्याती आहे. त्यांच्यासह, कृषिमंत्री शरद पवार, गृहमंत्री पी.चिदंबरम, कायदे मंत्री वीरप्पा मोयली, शिक्षण मंत्री कपिल सिब्बल अशा दिग्गजांची साथ डॉ मनमोहन सिंग यांना मिळाल्याने समस्यांच्या भोवऱ्यातील सरकारची नौका प्रतिकूल परिस्थितीवर मात करील, अशी आशा करता येईल.

■■■





# ११ वी प्रवेश कसा ? कोणाला ?

- निरंजन डावखरे
(अध्यक्ष, विद्यार्थी सेल, राष्ट्रवादी काँग्रेस)

आपल्या राज्यातील प्रचलित शिक्षणपद्धतीत १० वीच्या वर्षाला एक वेगळचं महत्व आहे. मुलांच्या भावी आयुष्याची, करिअरची यशस्वीतेची दिशा १० वी नंतरच ठरणार असते. त्यामुळे मुलांनी १० वी च्या परिक्षेत भरपूर मार्क मिळवावेत म्हणून पालक, शिक्षक आणि स्वतः मुलही जोरात प्रयत्न करतात. पण त्यांची खरी कसोटी लागते ती ११ वी साठी हव्या त्या शाखेत आणि हव्या त्या महाविद्यालयात प्रवेश मिळवतांना. अगदी आत्तापर्यंत म्हणजे तीन चार वर्षांपूर्वीपर्यंत ११ वी प्रवेशाची समस्या फार गंभीर प्रमाणात जाणवली नव्हती. पण आता मात्र या समस्येत विद्यार्थी, पालक, शिक्षक, शैक्षणिक संस्थांचे संचालक, शिक्षणखातं असं साऱ्यांनाच घेरलं आहे.

त्यामागे जे कारण सांगितले जाते ते आहे सीबीएससी आणि आयसीएससी बोर्डांची परिक्षापद्धती व महाराष्ट्रातील एसएससी बोर्डाची परिक्षापद्धती यातील फरकाचे. महाराष्ट्रातील बोर्ड यांचे अभ्यासक्रम वेगळे आहेत. परिक्षापद्धती सारखी नाही आणि निकालाची पद्धतही वेगळी आहे. त्यामुळे ११ वी साठी प्रवेश घेताना जेव्हा दोन्ही बोर्डाचे विद्यार्थी एकत्र येतात तेव्हा काही जणांवर अन्याय होताना दिसतो. हा अन्याय होऊ नये, विद्यार्थ्यांचे विनाकारण नुकसान होऊ नये, सर्वांना समान शैक्षणिक संधी मिळावी म्हणून गेली दोन-तीन वर्ष शासन प्रयत्न करीत आहे. परंतु अजूनही याबाबतचा सर्वमान्य तोडगा निघालेला नाही. जेव्हा ११ वी प्रवेशाची समस्या सर्वात पहिल्यांदा फार गंभीर बनली तेव्हा त्यावर पर्सेंटाइलचा तात्पुरता इलाज करून पाहिला गेला. त्यानंतर १९.१० चा फॉम्युला वापरून प्रवेश प्रक्रिया सुरळित करण्याचा प्रयत्न केला गेला आणि आता यावर्षीची १० वी ची परीक्षा सुरु होण्याआधी 'बेस्ट ऑफ फाइव्ह' हा पर्याय शासनाने पालक व विद्यार्थी यांच्यासमोर ठेवला आहे. मात्र यातील कोणत्याही उपायाने पालक, विद्यार्थी व शिक्षकांचे पूर्ण समाधान झालेले नाही.

'बेस्ट ऑफ फाइव्ह' म्हणजे ज्या सर्व विषयांची परिक्षा दिली त्यातील जास्तीत जास्त मार्क मिळविलेल्या पाच विषयांच्या आधारे त्या विद्यार्थ्यांची टक्केवारी निश्चित करणे. पूर्वी सीबीएससी आणि आयसीएससी बोर्डामध्ये हा फॉम्युला वापरला जात होता पण आता तसे होताना दिसत नाही. शिवाय या आधारे प्रवेश देतांना इतर विषयांत भरपूर मार्क पण

विज्ञानात मात्र काठावर पास अशी अवस्था असलेल्या विद्यार्थ्याला इतर विषयांतील मार्कांच्या जोरावर विज्ञान शाखेत प्रवेश मिळू शकेल, हे योग्य नाही. त्यामुळे बेस्ट ऑफ फाइव्ह हे सूत्र प्रवेशासाठी वापरणे अधिकच गोंधळाचे होऊ शकते. या सुत्राविषयी पालकांमध्ये, विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. हे 'बेस्ट ऑफ फाइव्ह' ठरवणार कोण? ॲडमिशन घेणारा विद्यार्थी का ॲडमिशन देणारी शिक्षण संस्था ? याबाबत खुलासा होणे जरुरीचे आहे. ११ वीच्या प्रवेशासाठी योग्य पर्याय काय ? या विषयावर महापालक संस्थेने मुंबईच्या साठ्ये महाविद्यालयात एक चर्चासत्र आयोजित केलं होतं. या चर्चासत्रात शिक्षणतज्ज्ञ, कायदेतज्ज्ञ, पत्रकार, महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी भाग घेतला होता. या चर्चासत्रातून ११ वी प्रवेशाबाबत जे अनेक मुद्दे मांडले गेले त्यातला एक मुद्दा असा होता की इतर अनेक राज्यांमध्ये ११ वी व १२ वी या शाळेच्याच इयत्ता आहेत. महाराष्ट्रात मात्र तसे नाही म्हणून १० वी च्या प्रवेशाला अवास्तव महत्व मिळत आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही शैक्षणिक संरचनेत बदल करून ११ वी व १२ वी पर्यंत शालेय कक्षा वाढवावी म्हणजे १० वी च्या गुणांचा व ११ वी च्या प्रवेशाचा प्रश्नच उरणार नाही. या संदर्भात महापालक संस्थेच्या अध्यक्षा सुजाता गांगुर्डे यांनी आपला सध्याचा १०+२ म्हणजे शाळेची दहा वर्षे नंतर कॉलेजची २ वर्षे हा शैक्षणिक आकृतीबंध बदलावा असा विचारही व्यक्त केला आहे. त्याऐवजी त्यांनी १ ली ते ७ वी आणि ८ वी ते १२ वी असा दोन टप्प्यातला शैक्षणिक आकृतीबंध सुचवला आहे. या आकृतिबंधात ८ वी १२ वी ची पाच वर्षे, सहा महिन्यांच्या प्रत्येकी दोन सेमिस्टरमध्ये विभागावीत आणि या वर्षांमध्ये विद्यार्थ्यांना चार विषय सक्तीचे तर तीन विषय पर्यायी असावेत असे सुचविले आहे. या प्रकारच्या शैक्षणिक आकृतीबंधात मुलांना कोणत्या विषयात खरच गती आहे हे कळणे सोपे जाईल व त्यांच्या करिअरचा प्रश्न मार्गी लागेल असा विश्वास सुजाता गांगुर्डे यांनी व्यक्त केला आहे. अशा प्रकाराने शिक्षणक्रमच बदलण्यात यावा असा विचार अनेक पालक, शिक्षक यांचा होताना दिसत आहे. त्याचप्रमाणे आपल्या राज्यात ११ वी प्रवेशासाठी किंवा मेडिकल इंजिनिअरींग प्रवेशासाठी देखील कोणताही कायदा नाही. असा कायदा बनवणे ही आता काळाची गरज बनली आहे.

बदलत्या काळाला अनुसरून ११ वी ची प्रवेश प्रक्रिया या ऑनलाईन करण्यात आली आहे. मात्र या ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतील त्रुटी दूर करणं जरुरीचं आहे. विद्यार्थ्यांना ज्या शाळेतून १० वी ची परिक्षा दिली त्याच शाळेतून त्यांना ११ वी चे प्रवेश अर्ज ऑनलाईन भरण्याची परवानगी मिळाली पाहिजे. हा ऑनलाइन अर्ज भरण्याचा सराव करण्याची सुविधाही विशेषतः ग्रामीण भागातल्या विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली पाहिजे. ग्रामीण भागातील ज्या शाळांमध्ये संगणकाची सोय नसेल तिथे जवळच्या महाविद्यालयात ऑनलाइन प्रवेश अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करून द्यावी. आर्टस, कॉमर्स आणि सायन्ससाठी वेगवेगळे ऑनलाइन फॉर्म असावेत आणि त्यांचे बारकोडही वेगवेगळे असावेत. गेल्यावर्षी ऑनलाइन प्रवेशाची यंत्रणा बनविण्याचे काम एकाच कंपनीला देण्यात आले होते. त्यामुळे सुरवातीला त्या यंत्रणेवर भरपूर ताण येऊन प्रवेस प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला होता. त्यामुळे अनेक प्रवेश केंद्रांवर पालकांनी आपला असंतोषही व्यक्त केला होता. यावर उपाय म्हणून इतर इच्छूक कंपन्यांच्या कार्यक्षमतेची खात्री करून, त्यांनाही प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घ्यावे.

काही वर्षांपूर्वी महाराष्ट्र राज्यात एस.एस.सी. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर केली जात असे. या गुणवत्ता यादीचा विद्यार्थी मनावर होणारा विपरित परिणाम स्पष्ट झाल्यानंतर बोर्डाकडून अशी मेरीट लिस्ट प्रसिद्ध होण्याचे थांबविण्यात आले. मेरीट लिस्टचा तणाव दूर झाला पण ११ वी च्या प्रवेशाचा गोंधळ वाढला. अशा परिस्थितीत सध्या आपले १० वी चे विद्यार्थी सापडलेले आहेत. त्यातून त्यांची लवकरात लवकर आणि सुखरूप सुटका करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शासनाने लवकरात लवकर अधिकाधिक पालक, शिक्षणसंस्था, शिक्षणतज्ञ यांच्याशी चर्चा करून योग्य मार्ग शोधला पाहिजे.

अभ्यासक्रमातील सुधारणा शैक्षणिक आराखड्याची संरचना बदलणे या गोष्टींना थोडा अधिक वेळ द्यावा लागेल. परंतु ११ वी च्या प्रवेशाचा तिढा मात्र लवकरात लवकर सुटायला हवा. विद्यार्थ्यांनी कोणत्याही बोर्डाची परिक्षा दिलेली असली तरी ११ वी च्या प्रवेशावेळी ते सगळे समान पातळीवर कसे येतील याचा विचार व्हायला हवा.

१० वी ची परिक्षा झालेल्या आणि पुढील शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला ११ वी त प्रवेश कसा मिळेल याकडे राज्य शासनाच्या शिक्षणखात्याने लक्ष देऊन, त्यासाठी कायमस्वरुपी उपाय शोधायलाच हवा.

■■■

# आंबासम्राट काकासाहेब चमणकर

-कृष्णा ऊर्फ अविनाश चमणकर



*माजी मुख्यमंत्री शरद पवार, डॉ. पद्मसिंह पाटील, दत्ता मेघे व इसाक जामखानवाला यांनी काकासाहेब चमणकर यांच्या खांबड येथील आंबा बागेस भेट दिली होती, त्यावेळचे छायाचित्र.*

भंडारी समाजातील निरलस, त्यागी वृत्तीचे आणि समाजसेवेचे एक निष्ठावंत उपासक म्हणजे नारायण महादेव चमणकर ऊर्फ काकासाहेब चमणकर. चिकाटी, आशावाद आणि अंगिकृत कार्याविषयीची निष्ठा या बळावर त्यांनी समाजकारण तसेच राजकारण या दोन्ही क्षेत्रात आपल्या पारदर्शी कार्याचा ठसा उमटवला.

२१ मार्च, १९०६ रोजी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ले तालुक्यातील उमादांडा या गावी एका गरीब शेतकरी कुटुंबात काकासाहेबांचा जन्म झाला. विद्यार्थीदशेत असतानाच त्यांनी 'वरचेमाड विद्यार्थी संघटना' स्थापन करून आपल्या सामाजिक कार्याचा पाया रचला. त्यानंतर सुप्रसिद्ध मिठाच्या सत्याग्रहातील आंदोलनात धडाडीने उडी घेत आपल्या राष्ट्रीय कार्याची मुहूर्तमेढ रोवली. त्याचवेळी तालुक्यातील शेतकऱ्यांना संघटित करून त्यांनी शेतकरी संघटनेमार्फत शेतकऱ्यांवरील अन्यायाला संघटितपणे वाचा फोडली. आपले सामाजिक उत्तरदायित्व पार पाडतानाच बॅ. पै. नाथ यांच्या मार्गदर्शनाखाली काकासाहेबांनी राजकारणात प्रवेश केला. १९५५ साली विधानसभेच्या निवडणुकीत प्रतिस्पर्धी दोन उमेदवारांच्या अनामत रकमा जप्त करून वेंगुर्ले विभागातून प्रचंड बहुमताने विधानसभेत आमदार म्हणून निवडून गेल्यानंतर त्यांनी अनेक

विधायक कामे केली.

आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत आंबा व काजूला मोठी मागणी असल्याने उत्पादित मालाचा सहज उठाव होऊन या पिकांना योग्य भाव मिळू शकेल. मात्र त्यासाठी आंबा, काजू या फळझाडांचे मोठ्याप्रमाणात उत्पादन घेणे आवश्यक आहे हे दूरदर्शी काकासाहेबांनी अचूक हेरले आणि कलमी आंब्यांची लागवड व विकास यावरचे शास्त्रोक्त शिक्षण घेऊन त्यांनी त्यावरचे प्रयोग यशस्वी केले. कोकणातील चढ-उतारावरील व पठारावरील नापीक म्हणून ठरलेल्या जमिनीवर त्यांनी लावलेली आंब्याची बाग ही संशोधनाची आणि प्रयोगाची शाळा बनली. कोकणचे नंदनवन करताना इथल्या शेतकऱ्यांना आंबा उत्पादनाचे महत्त्व पटवून देण्यासाठी त्यांनी वैयक्तिकरित्या आंबा पिक स्पर्धा सुरू केली. या योजनेला लाभलेला प्रचंड प्रतिसाद पाहून पुढे शासनाने सुद्धा ही योजना सुरू केली. बागायतीतून मिळालेला बहुतांश पैसा त्यांनी देवालये आणि सिंधुदुर्ग, रत्नागिरी आणि कोल्हापुरातील अनेक शैक्षणिक संस्थांना देणगीच्या स्वरुपात सत्कारणी लावला.



आंबाक्षेत्रातील भरीव कामगिरीसाठी सिंधुदुर्ग जिल्ह्यातील शेतकरी व बागायतदार लोकप्रतिनिधींनी १९७५ साली त्यांना 'आंबासम्राट' ही पदवी दिली. त्यानंतर त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेत कोकण कृषी विद्यापीठाच्या 'कृषिरत्न' (१९८२), महाराष्ट्र शासनाच्या 'कृषिभूषण' (१९८४), गोव्यातील झुवारी ॲग्रो केमिकल्स कंपनीच्या 'कृषिसम्राट' (१९८५) आणि यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या 'कृषि औद्योगिक समाजरचना' (१९९४) पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले. आंब्यात ग्रेडिंग पद्धतीने चांगली सुधारणा केल्यामुळे त्यांना केंद्र सरकारचे पहिल्या श्रेणीचे प्रमाणपत्रही मिळाले.

महाराष्ट्रात काँग्रेसची सत्ता असताना तत्कालीन कृषीमंत्री यांनी आंबा बागायतदारांसाठी अनेक लाभदायक योजना राबविल्या. तेव्हापासून सिंधुदुर्ग जिल्हा आंबा बागायत व शेतीमध्ये सुजलाम्, सुफलाम् झाला. महाराष्ट्राच्या या दूरदर्शी व धोरणी पुत्राने आंबाबागायतीत क्रांती घडविण्यासाठी वेळोवेळी कोकणाला भेटी देऊन आंबा बागायतदार व शेतकरी यांच्याशी चर्चा करून त्यातील सूचनांवर प्रत्यक्ष काम केले. तसेच काकासाहेब चमणकर यांच्या आंब्यावरील नवनवीन प्रयोगाची वेळोवेळी माहिती घेऊन कोकणातील आंबा बागायत व शेतींना भेटी देऊन कोकणचा कायापालट केला. आजही 'चमणकर' कुटुंबियांच्या स्मरणात शरद पवार साहेबांच्या घराला दिलेल्या भेटीचा प्रसंग ताजा आहे.

आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्यावर काकांची करडी नजर होती. त्यांच्या या शिस्तीत तावून-सुलाखून बाहेर पडलेले 'चमणकर कुटुंबिय' आज त्यामुळेच विविध क्षेत्रात नावारुपाला आले. कै. उपेंद्र चमणकर हे अपना बाजार व अपना बँकेच्या संस्थात्मक मंडळाद्वारे तर कै. मनोहर चमणकर हे भंडारी मंडळ व भंडारी बँकेचे धाडसी नेतृत्व म्हणून आपला ठसा उमटवून गेले. काकासाहेबांचे चिरंजीव श्री. जयप्रकाश चमणकर हे राजकारणात आहेत, तर त्यांचे एक नातू निलेश चमणकर हे सिंधुदुर्ग जिल्ह्यात युवा शक्तीचे नेतृत्व करीत आहेत. महाराष्ट्राच्या आर्थिक राजधानीत, मुंबईत कै. काकासाहेब चमणकर यांच्या प्रेरणेतून उदयास आलेली मे. पी. एस. चमणकर आर्किटेक्ट फर्म आणि मे. के. एस. चमणकर इन्फ्रास्ट्रक्चर लि. ही बांधकाम कंपनी याचे उत्तम उदाहरण होय.

'आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो आणि म्हणून समाजासाठी काहीतरी केलं पाहिजे', हा विचार प्रत्यक्ष कृतीतून अंमलात आणणाऱ्या काकासाहेबांची प्राणज्योत २२ सप्टेंबर १९९७ रोजी मालवली. आज काकासाहेब आपल्यात नसले तरी त्यांच्या पश्चात त्यांनी रुजवलेल्या कार्याचे बीज मात्र जोमाने बहरते आहे!

■■■

## राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी

# नवीन प्रदेश पदाधिकारी

अखिल भारतीय राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष व केंद्रीय कृषीमंत्री मा. ना. श्री. शरद पवार यांच्या मान्यतेने प्रदेशाध्यक्ष श्री. मधुकरराव पिचड यांनी खालील व्यक्तींचा समावेश नवीन प्रदेश कार्यकारिणीमध्ये केला आहे. ही नावे प्रदेश राष्ट्रवादीचे सरचिटणीस ॲड. गुरुनाथ कुलकर्णी यांनी जाहीर केली. पदाधिकाऱ्यांची नावे पुढीलप्रमाणे :

## उपाध्यक्ष

१) श्री. मदन बाफना
२) श्री. नबाब मलिक
३) श्री. रमेश बंग
४) श्री. कृष्णकांत कुदळे
५) श्री. वसंत वाणी
६) ॲड. माजिद मेमन
७) श्री. विजय कांबळे
८) श्री. जिवनराव गोरे
९) श्रीमती उषा दराडे
१०) श्री. विनायक मेटे
११) श्री. ईलियास नाईकवडी
१२) श्री. तोताराम कायंदे
१३) श्री. मधुकर सांभारे
१४) श्री. भारती लव्हेकर
१५) श्री. भुपेश बाबू
१६) श्री. भगवानराव यादव

## सरचिटणीस

१) श्री. गुरुनाथ कुलकर्णी
२) श्री. संजय खोडके
३) श्री. प्रकाश बिनसाळे
४) श्री. मुनाफ हकिम
५) श्री. प्रमोद हिंदुराव
६) श्री. अरविंद चव्हाण
७) श्री. कैलास कमोद
८) श्री. राजू तिमांडे
९) श्री. परवेज कोकणी
१०) श्री. रविंद्र माळवदकर
११) श्री. विनायक देशमुख
१२) श्री. कदिर मौलाना
१३) श्री. रमेश कदम
१४) श्री. विठ्ठल पाटील
१५) श्री. गजानन देसाई
१६) श्री. अभिराम सिंह
१७) श्री. नरसींग मेंगजी
१८) श्रीमती संध्या इंगोले
१९) श्री. उत्तमराव शेळके
२०) श्री. हेमराज शहा
२१) श्री. कमाल फारुकी
२२) श्री. रामराव वडकुते
२३) श्री. नेताजी राजगडकर
२४) श्री. हबीब फकी

## चिटणीस

१) श्री. बाप्पा सावंत
२) श्री. दिनकर तावडे
३) श्री. सुबोध सावजी
४) श्री. बिपीन कोल्हे
५) श्री. धनंजय दलाल
६) श्री. रमेश ना. कदम
७) श्रीमती भारती चव्हाण
८) श्री. राजेंद्र मर्चंड
९) श्री. पारसनाथ तिवारी
१०) श्री. मो.अ.मिसार ऊर्फ बाबा हाशमी
११) डॉ. गफार कादरी
१२) श्री. अशोक बाबर
१३) श्री. किशोर पाटील
१४) श्री. अशोक स्वामी
१५) श्री. हरिराम वरखेडे
१६) श्री. चंगेजखान पठाण
१७) श्री. सुरेश दलोड
१८) प्रा. विश्वनाथ कांबळे
१९) श्री. दीपक वडे
२०) श्री. भगवान करंकाल
२१) श्री. मनोहर डाके
२२) श्री. बाबाजी जाधव
२३) श्री. एल. बी. सिंग
२४) श्री. अशोक ओव्हाळ
२५) डॉ. इस्माईल कुरेशी
२६) श्री. आसिफ शेख
२७) श्री. सदानंद मंडलिक
२८) श्री. भगवान बिडवे
२९) श्री. कल्याण काळे
३०) श्री. नाना देवरे
३१) श्री. बालाजी शिंदे

## खजिनदार

**आमदार हेमंत टकले**

## प्रवक्ते

**श्री. मदन बाफना**
**श्री. नबाब मलिक**
**श्री. प्रकाश बिनसाळे**

# नवीन जिल्हाध्यक्षांची यादी

| नाव | जिल्हा | नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| नारायण श्रीधर भिसे (बाळ भिसे) | सिंधुदुर्ग | मोहम्मद युसुफ यासीन | मालेगाव (शहर) |
| कुमार शेट्ये | रत्नागिरी | मनोज दयाराम चौधरी | जळगाव (शहर) |
| वसंत ओसवाल | रायगड | युवराज पाटील | जळगाव (ग्रामीण) |
| आ. जितेंद्र आव्हाड | ठाणे (शहर) | चंद्रकांत केले | धुळे (शहर) |
| हणमंत जगदाळे (कार्याध्यक्ष) | ठाणे (शहर) | राजवर्धन कदमबांडे | धुळे (ग्रामीण) |
| आनंद ठाकूर | ठाणे (ग्रामीण) | श्रीमती कमलाताई मराठे | नंदुरबार |
| अभिमन्यु गायकवाड | कल्याण-डोंबिवली | मनमोहनसिंग ओबेरॉय | औरंगाबाद (शहर) |
| गोपीनाथ ठाकूर | नवी मुंबई | आ. संजय वाघचौरे | औरंगाबाद (ग्रामीण) |
| मोहन पाटील | मिरा-भाईंदर (शहर) | अंकुशराव टोपे | जालना |
| शेख महमंद खालिद | भिंवडी (शहर) | विजय मा. भांबळे | परभणी |
| मुख्तार अहमद (गुड्डु) | | एन. बी. शेख | लातूर |
| श्रीमती ज्योती कलानी | उल्हासनगर | बबन भोसले (कार्याध्यक्ष) | लातूर |
| गोविंद गुंजाळकर | वसई-विरार | अशोक डक | बीड |
| ॲड. वंदना चव्हाण | पुणे (शहर) | सुरेश बिरासदार | उस्मानाबाद |
| सुरेश घुले | पुणे (ग्रामीण) | रामनारायण काबरा | नांदेड (शहर) |
| आझम पानसरे | पिंपरी-चिंचवड | बापूसाहेब गोरठेकर | नांदेड (ग्रामीण) |
| महेश गादेकर | सोलापूर (शहर) | मुनीर पटेल | हिंगोली |
| मनोहर डोंगरे | सोलापूर (ग्रामीण) | सय्यद युसुफ अली | अकोला (शहर) |
| आर. के. पोवार | कोल्हापूर (शहर) | संतोषकुमार कोरपे | अकोला (ग्रामीण) |
| आ. के. पी. पाटील | कोल्हापूर (ग्रामीण) | दिलीप जाधव | वाशिम |
| मानसिंगराव गायकवाड (कार्याध्यक्ष) | | संजय पाटील | बुलढाणा |
| इंद्रिस नाईकवडी | सांगली (शहर) | अविनाश मार्डीकर | अमरावती (शहर) |
| विलासराव शिंदे | सांगली (ग्रामीण) | विजयराव भैसे | अमरावती (ग्रामीण) |
| आ. शशिकांत शिंदे | सातारा | अजय पाटील | नागपूर (शहर) |
| अंबादास गारुडकर | अहमदनगर (शहर) | सदानंद निमकर | नागपूर (ग्रामीण) |
| घनःश्याम शेलार | अहमदनगर (ग्रामीण) | धर्मरावबाबा आत्राम | गडचिरोली |
| गजानन शेलार | नाशिक (शहर) | अविनाश ब्राह्मणकर | भंडारा |
| श्रीराम शेटे | नाशिक (ग्रामीण) | प्रविण देशमुख | यवतमाळ |
| | | वसंतराव कार्लेकर | वर्धा |
| | | विनोद पांडुरंग हरिनखेडे | गोंदिया |
| | | राजेंद्र वैद्य | चंद्रपूर |

## जिल्हा मुंबई विभाग

| नाव | जिल्हा | नाव | जिल्हा |
|---|---|---|---|
| नरेंद्र राणे (कार्याध्यक्ष) | दक्षिण मुंबई | यशवंत देसाई | उत्तर-पश्चिम मुंबई |
| बापूसाहेब भुजबळ (अध्यक्ष) | दक्षिण मुंबई | रविंद्र पवार | दक्षिण-मध्य मुंबई |
| बस्तीवाला खान | उत्तर-मध्य मुंबई | प्रकाश सुर्वे | उत्तर मुंबई |
| | | विलास माने | ईशान्य मुंबई |





## श्रेष्ठ शिल्पकार? छे, छे, सृष्टीचा चमत्कार!

# श्रीराम सुतार

- डॉ. सुधीर भोंगळे

आपल्या अद्वितीय आणि अजस्त्र शिल्पकृतींच्या बळावर साऱ्या जगाला विस्मयचकित करुन सोडणारे श्री. राम सुतार म्हणजे केवळ श्रेष्ठ शिल्पकार नाहीत तर सृष्टीचा चमत्कार आहेत. धुळ्यानजिकच्या गोंदूर नामक खेड्यातील एका गरीब विश्वकर्मा कुटुंबात जन्मास आलेला हा मुलगा पुढील काळात अचाट अभ्यास, अपार मेहनत आणि शिल्प व चित्रकलेची जन्मजात जाण या त्रिगुणांच्या बळावर अनेक असाधारण शिल्पकृतींचा निर्माता बनला आहे आणि अक्षरशः जगाच्या कानाकोपऱ्यात पोहचला आहे.

प्रारंभी म्हटल्याप्रमाणे या विश्वकर्म्याची अनेक संघर्ष व चढ-उतारांनी भरलेली जीवनकहाणी म्हणजे अक्षरशः चमत्कार आहे. चौथीपर्यंतचे शिक्षण जन्मग्राम गोंदूरमधील प्राथमिक शाळेत पूर्ण केल्यानंतर छोट्या रामला पुढील तब्बल दीड दशक उच्च शिक्षण पूर्ण करण्यासाठी आणि अंगभूत कलागुणांचा विकास साधण्यासाठी धुळ्यापासून मुंबईपर्यंत अनेक ठिकाणी वणवण करावी लागली, आपल्याला आधार देणाऱ्या काही तथाकथित 'सज्जनांच्या (?)' कुटुंबात घरगडी म्हणून वावरावे लागले, परंतु त्यामुळे त्याचा आत्मविश्वास हरपला नाही अन् त्याची जिद्दही लोपली नाही. अखेर त्याचे फळ म्हणूनच की काय, रामच्या जीवनात धुळ्याच्या टीचर्स ट्रेनिंग कॉलेजचे चित्रकला शिक्षक श्रीराम कृष्ण जोशी या 'गुरुंचा' प्रवेश झाला आणि मग मात्र त्यांच्यापुढील वाटचालीचा मार्ग आपोआपच सुकर होत गेला. जोशी गुरुजींनी रामला केवळ चित्रकलेचे धडे दिले नाहीत तर अभ्यासाचे तक्ते बनविण्यासारखी छोटी-मोठी कामे मिळवून देत स्वतःच्या पायावर उभेही केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच पुढे रामला मुंबईच्या बॉम्बे आर्टस सोसायटीप्रमाणे सर जे जे स्कूल ऑफ आर्टचे दरवाजेही खुले झाले. जे जे मध्ये दाखल करण्यापूर्वी जोशी गुरुजींनी त्याला धुळ्यातील एक प्रसिद्ध शिल्पकार-चित्रकार व छायाचित्रकार हिरालाल मिस्त्री यांचा परिचय करुन दिला होता. या मिस्त्रींकडेच राम, छत्रपती शिवरायांच्या मूर्ती व पुतळे (पीस मोल्डस्) बनवायला शिकला आणि हे ज्ञान नंतर त्याला जे. जे. मधील शिक्षणक्रम सहजी पूर्ण करण्यास सहाय्यक ठरले. तोपावेतो 'स्क्रेचिंग'च्या तंत्रात तर तो इतका वाकबगार बनला होता की अनेकदा मूळ कॉपीचे हे 'ट्रेसिंग' तर नाही ना, अशी शंका त्याच्या शिक्षकांना येई.



*पार्लमेंटमध्ये बसविलेला म. गांधींचा हा पुतळा श्री. सुतार यांनीच घडविला आहे.*

जे. जे. त शिकत असताना रामने 'त्रिमूर्ती' न 'समुद्रमंथन' या भारतीय शैलीच्या शिल्पकृती तयार केल्या, ज्येष्ठ शिल्पकार खानविलकर यांच्याकडून गणेशमूर्ती बनविण्याचे कसब आत्मसात केले आणि 'मेटल डाइज' करण्यावरही प्रभुत्व मिळविले. हे हरहुन्नरी अष्टपैलूत्व १९५३ मध्ये त्याला स्कल्पल्चर डिप्लोमांच्या परीक्षेत सुवर्णपदक मिळवून देऊन गेले, ही परीक्षा उत्तीर्ण होणारा अणि तीही प्रथम क्रमांकाने तो सर्वांत लहान वयाचा विद्यार्थी होता.

महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केल्यावर रामचा धुळ्याचे तहसिलदार एस टी. चिमथनकर यांची कन्या प्रमिलाशी विवाह झाला आणि त्याचवेळी त्याला मुंबईचे ख्यातनाम शिल्पकार श्री. व्ही. पी करमरकर यांच्याकडे काम करण्याची संधीही मिळाली. त्यांचा सहाय्यक म्हणून वावरतांना रामने 'ब्राँझ कास्टिंग'चे तंत्र शिकून घेतले आणि मग तो ऑर्कियॉलॉजिकल सर्व्हे ऑफ इंडियात कर्मचारी म्हणून रुजू झाला. तेथे त्याला वेरुळ-अजिंठ्याच्या पुरातन लेण्यांच्या डागडुजी व जतनाचे अतिशय अवघड असे काम मिळाले. ते त्याने इतक्या मेहनत व कौशल्याने पूर्ण केले की

*वयाच्या ८५ व्या वर्षीही कामात मग्न असणारे श्री. सुतार*





*राष्ट्रपती नारायणन यांच्या हस्ते पद्मश्री पुरस्कार स्वीकारताना श्री. सुतार*

खुद्द पंतप्रधान जवाहरलाल नेहरुजींनीही त्याची पाठ थोपटली. रामच्या आयुष्यातील तो पहिला सुवर्णक्षण होता, असे म्हणायला हरकत नाही.

पुढे अशा सुवर्णक्षणांची बरसातच होत राहावी म्हणून की काय, १९५९ मध्ये नियतीने त्याला डीएव्हीपीचा (डायरेक्टोरेट ऑफ ऑडिओ व्हिज्युअल पब्लिसिटी) तांत्रिक सहाय्यक म्हणून चक्क राजधानी दिल्लीत आणले, तेथे रामच्या हातून चामुंडी टेकडीवरील नंदी-त्रिमूर्ती-प्रगती मैदानावर भरलेल्या कृषी प्रदर्शनाच्या प्रवेशद्वारी उभा केलेला १३ फुट उंचीचा शेतकऱ्याचा पुतळा, नटराज, ७ फूट उंचीचा अशोकस्तंभ-आणि ३५ फूट लांब, २३ फूट रुंद व ५८ फूट उंचीची चंबळ देवीची मूर्ती अशाअनेक शिल्पकृती आकारास आल्या. या साऱ्या उत्तमोत्तम शिल्पकृती आणि त्यांच्या बरोबरीने रामचे नावआता देशाच्या कानाकोपऱ्यात पोचायला सुरूवात झाली होती.

अर्थात या वाढत्या यशाबरोबर रामच्या हितशत्रूंची व सामान्य व्यावसायिक, स्पर्धकांची संख्याही वाढत गेली आणि एकीकडे नवनव्या आव्हानात्मक कलाकृतींच्या रचनांचा आनंद लुटत असताना दुसरीकडे त्याला कष्टप्रद आर्थिक अडचणींनाही सामोरे जावे लागले; परंतु गुरुजनांचे आशीर्वाद आणि ईश्वरीकृपेच्या बळावर जीवनातील सारी आव्हाने यशस्वीपणे पेलत त्यांनीआपली कलेची तपश्चर्या आज वयाच्या ८५ व्या वर्षीही अथकपणे चालू ठेवली आहे. या तपश्चर्येच्या माध्यमातून आजवर त्यांच्या हातून राष्ट्रपिता महात्मा गांधी, सरदार पटेल, पं. नेहरू, डॉ. आंबेडकर, गोविंद वल्लभ पंत, महात्मा फुले, इंदिरा गांधी अशा अनेक राष्ट्रपुरुषांप्रमाणे छत्रपती शिवराय, पृथ्वीराज चौहान, महाराजा रणजितसिंह राजर्षी शाहू, संत तुकाराम व श्री साईबाबा यांचे भव्य 'लाईफ साईज' पुतळे आकारास आले आहेत.

संसदभवनापासून भाक्रा-नानगलच्या 'तीर्थस्थाना'पर्यंत अनेक राष्ट्रीय





*महाराष्ट्र शासनातर्फे मुंबईच्या समुद्रात उभे करण्यात येणारे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प. हे काम श्री. सुतार यांनाच देण्यात आले आहे.*

महत्त्वाच्या वास्तू व प्रकल्पांचे भूषण ठरलेले हे पुतळे आणि 'ट्रॅम्फ ऑफ लेबर' म्यूरल ऑन ॲग्रीकल्चर, म्युरल ऑन इंडस्ट्री वा 'कृष्ण-अर्जुन मॉन्युमेंट' यांसारख्या अप्रतिम कलाकृती आपल्याला आपल्या गौरवशाली इतिहासाचे स्फूर्तीदायी स्मरण तर देतातच; परंतु राम सुतार यांच्या असीम कल्पनाशक्तीचे, अथांग बुद्धीमत्तेचे आणि 'न भूतो' म्हणाव्या अशा असाधारण कारागिरीचे दर्शनही घडवितात.

अर्थात रामभाऊंनी 'टाकीचे घाव ठोकून दगडांना देवरूप तर दिले आहेच; परंतु टाकीचे घाव सोसत स्वत:चे जीवन घडवित असताना चिरंजीव अनील सारखा अव्वल दर्जाचा आर्किटेक्चर पुत्रही तयार केला आहे. 'बापसे सवाई' असलेले हे अनीलजी आता अमेरिकेसारख्या प्रगत देशात आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवून मायदेशी परतले आहेत आणि आपल्या कलासक्त पिताजींच्या साधनेचा वारसा तितक्याच समर्थपणे पुढे चालवित आहेत. अर्थात असा पराक्रमी पुत्र हाताशी असल्यामुळेच की काय आज वयाच्या ८५ व्या वर्षीही रामभाऊंचा नवनिर्मितीचा उत्साह व सोस कायम आहे. हा वयोवृद्ध कलामहर्षी आजही दिवसाचे ८-१० तास नोईडातील आपल्या स्टुडिओमध्ये 'दिसामाजी काही तरी नवे घडवावे' हा मंत्र जपत कार्यमग्न असतो. आपल्या आजवरच्या कार्याचे वर्णन करताना ते स्वत: म्हणतात, की 'Whatever I have done till today, has been like a seed and the seed has flowered & got me new seeds. My motto has been to do justice to the work and my reward has been the appriciation & applause from the people."

एका शब्दात सांगायचे, तर 'कर्मण्येवाधिकारस्ते मां फलेषु कदाचन्' हेच राम सुतार नावाच्या विश्वकर्म्याच्या उदंड कर्तृत्त्व संपन्न यशोगाथेचे आधारसूत्र आहे. त्याच्या आधारे साधे, सरळ जीवन जगत असताना रामभाऊ स्वत: तर आभाळाएवढे मोठे झाले आहेतच; पण या महान देशाच्या कला व संस्कृतीच्या संपन्न वारशातही त्यांनी फार मोठी भर टाकली आहे यात तीळमात्र शंका नाही.

■■■



मागोवा क्रीडाविश्वाचा

# भारतीय क्रिकेट संघाच्या 'विश्वविजेतेपदा'वर शिक्कामोर्तब

## सचिन दि ग्रेट

- मुकुंद मोघे



**भा**रतीय क्रिकेट संघाच्या दृष्टीने सरता फेब्रुवारी महिना तसा चढ-उताराचा ठरला. परंतु अखेर कसोटी क्रिकेट संघाच्या जागतिक क्रमवारीत प्रथमच मिळालेले अव्वल स्थान अगदी झोकात टिकवून त्याने आपल्या सर्वश्रेष्ठत्त्वावर यंदा तरी अधिकृत शिक्कामोर्तब केले आहे. गेली तब्बल सात वर्षे या सर्वोच्च स्थानावर रिकी पॉन्टिंगचा बलाढ्य ऑस्ट्रेलिया संघ ठाण मांडून बसला होता, पण यंदा 'अ‍ॅशेस' मालिकेतील अनपेक्षित पराभवामुळे त्याच्या विजयी मक्तेदारीस तडा गेला आणि ती गोष्ट भारत व दक्षिण आफ्रिका संघाच्या पथ्यावर पडली.

या दोन अव्वल संघांदरम्यानची दोन कसोटी सामन्यांची छोटेखानी मालिका नुकतीच १-१ अशी बरोबरीत सुटली. खरे तर, या मालिकेतील पहिली नागपूर कसोटी जेमतेम चार दिवसांत जिंकून द. आफ्रिका संघाने धोनी आणि कंपनीस चांगलाच शह दिला होता. त्या कसोटीत प्रथम खेळताना २ बाद ६ अशा खराब सुरुवातीनंतर द. आफ्रिकेने ६ बाद ५५८ अशी प्रचंड धावसंख्या रचली. जुना जाणता जॅक कॅलिस आणि 'मिस्टर परफेक्ट' म्हणून उदयास येऊ पाहात असलेला हशीम अमला यांची ३५० हून अधिक धावांची भागी हे या डावाचे वैशिष्ट्य ठरले. ही भागीदारी करताना कॅलिसने १८३ धावा ठोकत कसोटीतील आपले ३४ वे शतक झळकावले तर अमलाने नाबाद २५३ धावा करून भारतीय गोलंदाजांवर संपूर्ण वर्चस्व गाजविले.



द. आफ्रिकेच्या या मोठया धावसंख्येचा पाठलाग करताना भारतीय संघ पहिल्या डावात जेमतेम २३० तर दुसऱ्या डावात ३०९ धावा करू शकला. सलामीवीर सेहवाग आणि सदाबहार सचिन यांनी अनुक्रमे पहिल्या व दुसऱ्या डावात शतकी खेळ्या करून संघाचा डाव सावरण्याचा झुंझार प्रयत्न केला, परंतु द्रुतगती डेल स्टेनच्या झंझावातापुढे बाकी सारे भारतीय फलंदाज अक्षरशः ढेपाळले आणि मग मायदेशात डावाने हरण्याची नामुष्की त्यांच्यावर दीर्घावधीनंतर ओढवली.

या सामन्यांत दहा बळी घेऊन स्टेनने खरोखरच कमाल केली आणि ठणठणीत (डेड) खेळपट्टीवर भेदक स्विंग गोलंदाजी कशी करावी याचा एक आदर्श वस्तुपाठच सादर केला. परंतु ही कमाल तो नंतर कोलकत्त्यातील 'ईडन गार्डन'वर मात्र अजिबात दाखवू शकला नाही आणि मग पाहुण्या संघावर डाव उलटविणे भारतास सहज शक्य झाले.

खराब हवामान व आकस्मिक पावसाचा फटका बसलेल्या कोलकत्ता कसोटीतही कर्णधार ग्रॅएम स्मिथ पूर्ण 'फ्लॉप' गेल्यामुळे द. आफ्रिका संघाचा डाव प्रारंभीच लडखडला होता. पण जखमी बाऊचरच्या अनुपस्थितीमुळे अचानकपणे खेळण्याची संधी मिळालेला एडवर्डस आणि नागपूर कसोटीत अडीचशे डावांची खेळी केलेला अमला यांनी सुरेख शतके ठोकून आपल्या संघाला मालिकेवर निर्विवाद वर्चस्व गाजविण्याची संधी मिळवून दिली. त्यांच्या डी व्हीलर्स,








ड्युमिनी व ॲश्वेल प्रिन्स सारख्या सहकाऱ्यांनी या संधीचे सोने करणे अपेक्षित होते. परंतु जलदगती झहीर खान व स्पिन विझार्ड हरभजनसिंग यांनी टिच्चून गोलंदाजी करीत द. आफ्रिकेचा डाव २९६ धावांतच गुंडाळला.

या माफक आव्हानास मुँहतोड जबाब देताना भारताने ६ बाद ६४३ धावांचा डोंगर रचला. तो रचण्यात सेहवाग (१८५), सचिन (१०६), व्हेरी व्हेरी स्पेशल लक्ष्मण (नाबाद १३२) या चौघांनी सिंहांचा वाटा उचलला. या डावातील शंभरी हे सचिनचे ४७ वे शतक असून बांगला देश पाठोपाठ द. आफ्रिकेविरुद्धही सलग दोन शतके ठोकून त्याने आपण 'सदाबहार' आहोत. हे पुन्हा एकवार निर्विवादपणे सिद्ध करून दिले आहे. त्याच्या या विस्मयचकित करणाऱ्या कामगिरीवर कळस चढविला तो मात्र हरभजनने! गेला काही काळ फारशा फॉर्मात नसलेल्या या कसबी गोलंदाजाने ५ बळी घेत द. आफ्रिकेचा दुसरा डाव ३२० धावांत संपविला आणि भारताला १ डाव १२३ धावांनी दणदणीत विजय मिळवून दिला. या ऐतिहासिक विजयामुळे ही मालिका तर बरोबरीत सुटलीच पण प्रारंभी म्हटल्याप्रमाणे भारतीय संघाच्या सर्वश्रेष्ठत्त्वावर अधिकृत शिक्कामोर्तबही झाले आहे.

भारतीय क्रिकेटच्या इतिहासातील हा सुवर्णक्षण आहे, यात शंकाच नाही. त्याचा आनंद लुटत असताना आपली बेंच स्ट्रेंग्थ फारशी चांगली नाही हे मात्र दुर्लक्षून चालणार नाही. गेल्या दीड दशकाहून अधिक काळ भारतीय क्रिकेटचे खंदे आधारस्तंभ म्हणून वावरलेली तेंडुलकर-द्रविड व लक्ष्मण ही पराक्रमी त्रिमूर्ती आता निवृत्तीच्या वाटेवर आहे. त्यांची जागा घेऊ शकतील असे नवे, ताज्या दमाचे खेळाडू लौकर शोधले गेले नाहीत तर सध्या आघाडीवर असलेला आपला संघ पुन्हा पूर्वपदावर- तळात जायला फार वेळ लागणार नाही. असो.

# दिनेश कार्तिक-पठाणची कमाल

भारतीय क्रिकेट संघ दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत बिझी असताना हैदराबादेत दुलीप करंडक स्पर्धेचा अंतिम सामना खेळविला गेला. दिनेश कार्तिकच्या



नेतृत्वाखालील दक्षिण विभाग विरुद्ध इरफान पठाणचा पश्चिम विभाग यांच्या दरम्यानची ही लढत स्वतंत्र तेलंगण आंदोलनामुळे तशी रिकाम्या स्टेडियममध्येच झाली पण कार्तिक व युसूफ पठाणच्या झंझावाती फलंदाजीमुळे अतिशय संस्मरणीय ठरली.

या सामन्यात द. विभागाने पहिल्या डावात ४०० धावांचा पल्ला गाठला. तो मुख्यतः दिनेश कार्तिकच्या १८३ धावांच्या बळावर! तो हा जंगी डाव खेळत असताना त्याचे अन्य सहकारी मात्र इरफान पठाणच्या (१०० धावांत ५ बळी) अचूक गोलंदाजीवर साफ चकले. फलंदाजीतील ही कसर नंतर दक्षिणेच्या सी. गणपती या गोलंदाजाने चांगली भरून काढली आणि प. विभागाचा पहिला डाव २५१ धावांत संपविला. युसूफ पठाणच्या १०८ धावा हे या डावाचे वैशिष्ट्य होते.

दक्षिण विभागाच्या दुसऱ्या डावात कार्तिकने पुन्हा दीडशे धावा ठोकल्या आणि आपल्या संघाला ९ बाद ३८६ अशी सुस्थिती प्राप्त करून दिली. आता दुलीप करंडकावर कब्जा करण्यासाठी पश्चिम विभागापुढे विक्रमी ५३६ धावांचे आव्हान होते. ते पेलले जाईल अशी कोणी कल्पनाही केली नव्हती. परंतु Cricket is a game of glorious uncertainties हेच खरे! युसुफ पठाणच्या नाबाद २१० धावांच्या खेळीने अखेर अशक्य ते शक्य करून दाखविले आणि प. विभाग संघाच्या नावावर एका रोमहर्षक विजयाची नोंद झाली.

या सामन्यातील अप्रतिम खेळामुळे आता काही काळापूर्वी भारतीय संघाबाहेर फेकल्या गेलेल्या कार्तिक व युसुफ पठाण या दोन्ही गुणी खेळाडूंच्या कारकिर्दीचे पुनरुज्जीवन होण्याची शक्यता आहे. अर्थात डोमेस्टिक क्रिकेटमध्ये दाखविलेली चमक फ्ल्युक नव्हती, हे मात्र त्यांना पुन्हा सिद्ध करावे लागेल हे निश्चित.

# वेस्ट इंडिज चारी मुंड्या चित!

गेल्या महिन्यात ऑस्ट्रेलियाविरुद्धची कसोटी मालिका २-० अशी गमावून मायदेशी परतलेला वेस्ट इंडिज संघ आता पाच दिवसीय व दोन ट्वेंटी २० सामन्यांच्या मालिका खेळण्यासाठी पुन्हा ऑस्ट्रेलियात दाखल झाला आहे. विशेष म्हणजे मेलबर्नमध्ये आल्यावर त्यांचा कर्णधार ख्रिस गेलने आगामी एकदिवसीय सामन्यांची मालिका ४-१ अशी जिंकण्याची दर्पोक्ती केली होती. परंतु प्रत्यक्ष मैदानात मात्र ऑस्ट्रेलियानेच ४-० अशी बाजी मारून विंडीजला अक्षरशः चारी मुंड्या चित केले. खुद्द कर्णधार पॉन्टिंग, अष्टपैलू वॅटसन, अनुभवी मायकेल हसी व व्हाइटची सुरेख फलंदाजी आणि बोलिंगर व रियान हॅरिस या नवोदित दुकलीची भेदक गोलंदाजी



ऑस्ट्रेलियाचे बलस्थान असून, त्याच्या बळावर गेल्या चार-सहा महिन्यांत त्यांचा अश्वमेधी वारु पुन्हा जग जिंकण्याच्या मोहिमेवर निघाला आहे. या संघाची कामगिरी उत्तरोत्तर सुधारत चालली असताना कॅरेन पोलार्डसारखा हुकुमी सिक्सर स्पेशालिस्ट गवसल्यानंतरही वेस्ट इंडिज संघाच्या दर्जात काहीही सुधारणा होऊ शकलेली नाही. एकेकाळी तो संघ निरपवादपणे वर्ल्ड चॅम्पियन होता, परंतु आता मात्र तो तळातील बांगला देश संघाच्या रांगेतच बसण्याच्या लायकीचा बनला आहे. कदाचित मेंदू गुडघ्यात असल्यामुळे की काय, कर्णधार गेलच्या मात्र ते अद्याप लक्षात आलेले नाही, असे दिसते.

## क्रिकेटला ऑलिम्पिकची मान्यता

क्रिकेटला आता ऑलिम्पिक खेळाचा दर्जा प्राप्त झाला असून, २०२० च्या ऑलिम्पिकमध्ये क्रिकेट स्पर्धांचा अंतर्भाव होऊ शकतो. अर्थात तेथे कसोटी वा एकदिवसीय नव्हे तर ट्वेंटी २० चेच सामने होतील आणि कसोटी क्रिकेटला ते मारक ठरेल, असे अनेक तज्ज्ञांचे मत आहे. सध्या तरी दिल्ली बहुत दूर असली तरी ऑलिम्पिक संघटनेच्या मान्यतेमुळे क्रिकेटचे महत्त्व वाढणार आहे, हे निश्‍चित.

## 'गोल्फर' भुल्लरचे सुयश

भारताचा एकवीस वर्षीस गोल्फर गगनजित भुल्लर याने नुकतीच बँकॉकमध्ये एशियन टूर इंटरनॅशनल स्पर्धा जिंकली आणि तब्बल बावीस लाख रुपये रकमेचे बक्षीस पटकावले. या स्पर्धेत कोरियाचा वांग इनछुन उपविजेता ठरला. एशियन टूर स्पर्धा एकपेक्षा अधिक वेळा जिंकणारा भुल्लर हा सहावा भारतीय खेळाडू असून, गेल्या वर्षी त्याने आपले पहिले अजिंक्यपद पटकावले होते.



## आनंदचे धक्कादायक अपयश

आपला अव्वल बुद्धीबळपटू विश्‍वनाथन आनंद यावेळी कोरेस चेस टूर्नामेंटमध्ये चक्क चौथ्या स्थानावर फेकला गेला.



नॉर्वेचा वर्ल्ड नंबर वन मॅग्नस कार्लस ही स्पर्धा जिंकत असताना रशियाच्या व्लादिमिर क्रामनिकला उपविजेते पदावर समाधान मानावे लागले.

आजवर या स्पर्धेत आनंदनेच सर्वाधिक विजय नोंदविले आहेत. परतु यंदा मात्र स्पर्धेतील तेरापैकी अकरा सामने त्याला बरोबरीत (ड्रॉ) सोडविणे भाग पडले. त्याच्या खेळाला नेमकी कशामुळे ही उतरती कळा लागली आहे, हे कळायला मार्ग नाही. परंतु त्याची आजवरची झळाळती कारकिर्द पाहाता यावेळचे अपयश ही पासिंग फेज ठरेल, अशी आशा वाटते.

## वर्ल्ड कपसाठी हॉकीपटू सज्ज

राजधानी दिल्लीत २८ फेब्रुवारीपासून हॉकीची विश्‍वकरंडक स्पर्धा सुरू झाली असून, या स्पर्धेत भारतीय संघाचे नेतृत्व राजपालसिंग करणार आहे. अर्थात त्यांच्या नियुक्तीवरून संघात जो वाद माजला तो मात्र खचितच दुर्लक्ष करण्यासारखा नव्हता. कर्णधारपद राजपालकडे नव्हे तर प्रभज्योतसिंगकडे सोपवावे, अशी मागणी संघाचे मुख्य प्रशिक्षक ब्रासा यांनीच केली होती आणि त्यास काही मुख्य खेळाडूंचा पाठिंबाही होता. आता तो वाद मिटल्याचे सांगितले जात




असले तरी पडद्यामागे नेमके काय घडले आणि त्याचे परिणाम प्रत्यक्ष स्पर्धेतील काय होणार हा प्रश्‍न सध्यातरी अनुत्तरित आहे. कदाचित स्पर्धेत भारतीय संघाची जी काही कामगिरी होईल त्या आधारे नंतरच या साऱ्याचा यथोचित पंचनामा होईल.दरम्यान, चंडीगडमधील एका चॅरिटी सामन्यात उतरण्यासाठी भारतीय हॉकीपटूंनी पाच कोटी रुपयांची मागणी केल्याचे खळबळजनक वृत्तही प्रसिद्ध झाले असून आपल्या हॉकी क्षेत्रास सध्या तरी ऑल इज नॉट वेल असेच संतापजनक वातावरण असल्याचे त्यावरून स्पष्ट होते.

भारताने विश्‍वकरंडक हॉकी स्पर्धेत सलामीलाच पाकिस्तानला ४-१ ने पराजित करीत जणू स्पर्धेपूर्वीच्या सदोष पूर्वतयारीची होळी करून विजयाचे रंग उधळण्यास प्रारंभ केला आहे. शिवेंद्र, संदीप आणि प्रभज्योत या तीन 'सिंग'नी गोल करीत भारतास भारतीयांसाठी विश्‍वकरंडकाची 'फायनल' असलेल्या लढतीत 'किंग' केले. नवी दिल्लीतील मेजर ध्यानचंद नॅशनल स्टेडियमवर झालेल्या या हॉकी सामन्यांकडे सगळ्या देशाचे लक्ष लागले होते. सामन्यापूर्वीच्या भारतीय राष्ट्रगीताची सांगता होताना पाठिराख्यांनी जोरजोरात 'जय हे, जय हे' म्हणत भारताच्या टीमला प्रोत्साहन देण्यास सुरुवात केली आणि भारतीयांनी पहिल्या मिनिटांपासून घेतलेली सामन्यांवरची पक्कड अखेरपर्यंत कायम ठेवली.

## दक्षिण आशियायी क्रीडास्पर्धेत भारत अव्वल

ढाक्का येथे झालेल्या दक्षिण आशियायी क्रीडा स्पर्धेत सर्वाधिक ९० सुवर्णांसह एकूण १७५ पदके पटकावून भारतीय क्रीडापटूंनी अव्वल स्थान मिळविले. जलतरण, टेबल टेनिस लॉन टेनिस आणि सर्व मैदानी खेळात भारतीयांनी बाजी मारली. अर्थात त्यांच्या प्रतिस्पर्धी संघाचा- भुतान, बांगला देश म्यानमार वगैरे- दर्जा तसा सुमारच होता हे विसरून चालणार नाही.

## टायगर वुडस्‌ची क्षमायाचना

संशयास्पद चारित्र्याच्या डझनभराहून अधिक ललनांशी विवाहबाह्य संबंध ठेवल्यामुळे सर्वदृष्ट्या बदनाम झालेल्या व अडचणीत आलेल्या 'गोल्फ किंग' टायगर वुडसने आता आपल्या बेबंद-बेजबाबदार वर्तनाबद्दल जाहीर क्षमायाचना केली आहे. वुडसच्या भानगडींचे भांडे फुटल्यावर त्याच्या पत्नीने घटस्फोटाची तयारी केली होती आणि आपल्या दोन छोट्या मुलांसह



ती अन्यत्र राहायलाही गेली होती. परंतु आता या कुटुंबाचे पुनर्मिलन झाले असून, लौकरच टायगर वुडस् पुनःश्च मैदानाकडे परतेल, अशी चिन्हे आहेत.

## व्हीनस विल्यम्स-शारापोवाचे विजय

ऑस्ट्रेलियन ओपन टेनिस स्पर्धेत अतिशय निराशजनक खेळ केलेल्या व्हीनस विल्यम्स व मारिया शारापोवा यांनी गेल्याच आठवड्यात अनुक्रमे दुबई ओपन व मेम्फिस ओपन स्पर्धा जिंकल्या आणि आपली कारकिर्द अद्याप संपलेली नाही, हे सिद्ध करून दिले.

## आता आयपीएलचे वेध

इंडियन प्रिमियर लीगची तिसरी स्पर्धा येत्या १२ मार्चपासून भारतात सुरू होत आहे. गेल्या वेळी दहशतवाद्यांच्या हल्ल्यांचा धोका असल्याने अगदी अखेरच्या क्षणी ही स्पर्धा दक्षिण आफ्रिकेत खेळविली गेली होती. यावेळी दहशतवाद्यांच्या हल्ल्याची भिती तर कायम आहेच. परंतु ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटूंना भारतात खेळू न देण्याची धमकी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी दिल्यामुळे वातावरणातील तणाव अधिकच वाढला आहे. दरम्यान, स्वतंत्र तेलंगण आंदोलनाचा जोरही वाढत चालला असून, काही प्रमुख सामन्यांची ठिकाणे बदलल्यामुळे डेक्कन चार्जर्ससारखे संघ नाराज झाले आहेत. या सर्व अडचणींवर आयपीलएलचे कमिशनर ललित मोदी कशी मात करतात, हे पाहाणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

## ब्रेट ली कसोटीतून निवृत्त

ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज ब्रेटलीने आता कसोटी क्रिकेटला रामराम ठोकला आहे. गेली दोन वर्षे विविध प्रकारच्या दुखापतींनी ग्रस्त असल्यामुळे रिझर्व्ह बेंचवर आढळणारा हा ३३ वर्षीय खेळाडू यापुढे मुख्यतः ट्वेंटी २० च्या सामन्यांतच भाग घेणार आहे. आपल्या कसोटी कारकिर्दीची सुरुवात १९९९ मध्ये करणारा ली ७६ कसोटी सामने खेळला असून, त्याच्या नावावर ३१० बळी जमा आहेत. शेन वॉर्न, ग्लेन मॅकग्रा व डेनिस लीली या महान त्रयीनंतर ऑस्ट्रेलियातर्फे सर्वाधिक गडी बाद करण्याचा चौथा मान त्यांच्याकडेच जातो.



■■■

## सचिनचा नवा विश्वविक्रम



दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या दोन कसोटींच्या मालिकेत दोन सुरेख शतके झळकावणाऱ्या 'मास्टर ब्लास्टर' सचिन तेंडुलकरने आता एक दिवसीय सामन्यातही शानदार द्विशतक तडकावले आहे. गेल्या तीन दशकात सुमारे तीन हजार एक दिवसीय सामने झाले असून त्यात द्विशतकी खेळी करणारा सचिन हा पहिलाच खेळाडू ठरला आहे. या महान खेळाडूची बॅट आजवर ४४२ एकदिवसीय सामन्यांत- हाही विक्रमच! तळपळी असून, आता आंतरराष्ट्रीय सामन्यांतील त्याची एकूण शतक संख्या तब्बल ९३ वर गेली आहे. सचिनच्या ताज्या पराक्रमामुळे भारतीय संघाने द. आफ्रिकेविरुद्धची एकदिवसीय सामन्यांची मालिका सहज जिंकली असून, आंतरराष्ट्रीय क्रमवारीतील आपले दुसरे स्थान टिकविले आहे. तेथील अव्वलस्थानी अर्थातच नेहमीप्रमाणे ऑस्ट्रेलियाचा संघ आहे.